# आजचा सुधारक

विवेकवादी चिंतनाला वाहिलेली ग्रंथमाला



देशप्रेमीं'चा कोर्टाबाहेरील न्यायनिवाडा

# या अंकात


| | | | |
|---|---|---|---|
| 1. | संपादकीय | | 3-4 |
| 2. | मराठवाड्यातील दुष्काळ : एक पाहणी | वसंत फुटाणे | 5-15 |
| 3. | ग्राउंड झीरो : जे एन यु | जयंतकुमार सोनवणे | 16-25 |
| 4. | प्रतिसाद | अनुराधा मोहनी | 26-28 |
| 5. | आत्मशोधार्थ शिक्षण | बालकृष्ण पिशुपती | |
| | | (अनुवाद : अंबुजा साळगांवकर, जयंत कीर्तने) | 29-41 |
| 6. | अनुभव: | सुरेश सावंत | 42-47 |
| 7. | कविता: मुली | देवमणी पांडेय | 48 |



संस्थापक संपादक
**दि. य. देशपांडे**

संपादक
**रवीन्द्र रुक्मिणी पंढरीनाथ**

प्रकाशन – 3 मार्च 2016
प्रकाशकः भरत मोहनी, श्रीमोहिनीराज, खरे टाऊन, धरमपेठ, नागपूर 440010.
मुद्रकः नितीन तापस, श्याम ब्रदर्स, एस.टी.स्टँड रोड, नागपूर-18.
किरकोळ प्रत – रु.30 फक्त



**संपर्कः**
रवीन्द्र रुक्मिणी पंढरीनाथ ravindrarp@gmail.com
editor.sudharak@gmail.com
भरत मोहनी bharat_i@yahoo.com (9822736808)


ही ग्रंथमाला संक्षिप्त स्वरूपात www.aajachasudharak.in वर प्रकाशित होते, संपूर्ण ग्रंथमाला मुद्रित पुस्तकाच्या स्वरूपात हवी असल्यास वर्षभरासाठी रु.300 व्यक्तीसाठी आणि रु.350 संस्थेसाठी पाठवून सभासद व्हावे. सभासद शुल्क मनीआर्डर अथवा पेयेबल अट पार चेक ने आजचा सुधारक, 201, श्रीमोहिनीराज, खरे टाऊन, धरमपेठ, नागपूर-440010. येथे पाठवावे.

# संपादकीय

आपल्या सभोवताली विलक्षण वेगाने इतक्या काही घटना घडत आहेत की सुजाण व संवेदनशील माणसाला हतबुद्ध होण्याशिवाय पर्यायच उरू नये. रोहित वेमुलाच्या आत्महत्येच्या प्रकरणाचे धागेदोरे उलगडू लागतात न लागतात, तेव्हढ्यात जे एन यु घडते. तेथील एका छोट्या घटनेचे निमित्त करून देशातील ह्या अग्रगण्य शिक्षणसंस्थेला देशद्रोह्यांचा अड्डा म्हणून बदनाम करण्यात येते. तेथे नेमके काय घडले हे चित्र स्पष्ट होईपर्यंत आता अलिगढ मुस्लीम विद्यापीठाची पाळी आलेली दिसते. एकूण देशप्रेमाचे हाकारे देत जे कोणी आपल्याला कोणत्याही कारणाने विरोध करतील त्या सर्वांविरुद्ध रान पेटवत देशद्रोही म्हणून त्यांची शिकार करायची हाच उद्देश असावा अशी शंका येते.

अशा प्रसंगांमध्ये विविध विचारप्रवाहांमध्ये संवाद घडून समाज/देश ह्यांची मानवतेकडे वाटचाल होण्यासाठी धडपडणाऱ्या आपल्यासारख्या व्यक्ती व 'आजचा सुधारक'सारखी नियतकालिके ह्यांची काय भूमिका असू शकेल? एकीकडे 'इंडियन एक्स्प्रेस' व 'हिंदू' सारखी नियतकालिके, 'scroll.in' सारखी संकेतस्थळे, सोशल मिडियावरील विविध समूह, यू ट्यूब वरून व्हायरल होणारे व्हिडीओ यांच्यामधून संबधित माहितीचा पूर वाहत आहे. त्यातून ह्यातील प्रत्येक घटनेचे धागेदोरे उलगडत आहेत. अनेक नवे पैलू प्रकाशात येत आहेत. राष्ट्रवाद, अभिव्यक्ती स्वातंत्र्य, नागरिकांचे हक्क व कर्तव्ये, विद्यार्थी आंदोलन, शिक्षण पद्धती व शिक्षणविषयक धोरण अशा सर्व संबंधित विषयांवर आज विश्लेषणात्मक गंभीर लेख, व्याख्याने, व्यंगचित्रे, गाणी, 'किस्सागोई' (विनोदी ढंगाचे कथात्मक निरुपण) असे सर्व साहित्य उपलब्ध आहे. पण दुसरीकडे ह्यातील बहुतेक साहित्य त्याच त्या वर्तुळात फिरत राहिल्यामुळे सर्वांना उपलब्ध होत नाही. ज्यांना हे ज्ञान होते त्यांनाही काय कृती करावी हे कळत नाही व ते निष्क्रिय राहतात, तर दुसरीकडे हजारो लाखो तरुण डोक्याला कसलाही त्रास न देता भडकाऊ, आगलावू भाषणे किंवा घोषणा ऐकून, सोशल मीडियावरील तद्दन खोट्या पोस्ट्स वाचून आपली मते बनवितात व आपल्याहून वेगळे विचार मांडणाऱ्या व्यक्तींना समाज/राष्ट्राचे शत्रू कल्पून त्यांना धडा शिकविण्यासाठी सज्ज होतात. त्यामुळे ज्ञानवान विवेकी माणसांना कृतिप्रवण करणे, समाजावर प्रभाव टाकणाऱ्या घटना/समस्या ह्यांमागील दुर्लक्षित पैलू समाजातील बहुसंख्य लोकांच्या ध्यानात आणून देणे व अविवेकी कृती करणाऱ्यांशी संवाद साधून त्यांना त्या

कृतीपासून परावृत्त करणे, असे हे तिहेरी आव्हान आहे.

ब्रेकिंग न्यूजच्या व माहितीच्या महापुराच्या काळात ‘आजचा सुधारक’ला तात्कालिक माहितीच्या पलीकडे जाऊन दृष्टिकोन व विचार देणे, मुख्य प्रवाहातल्या माध्यमांनी दुर्लक्षित केलेले विषय, पैलू मांडणे, असे बरेच काही करून आपली प्रासंगिकता टिकवून ठेवायची आहे. त्या दिशेने आम्ही करीत असलेले प्रयत्न, उदा. मुखपृष्ठाचे वेगळे रूप, कविता, अनुभव ह्यांना अंकात दिलेले स्थान ह्या बाबी आमच्या वाचकांच्या ध्यानात आल्या असतीलच.

जे एन यु त नेमके काय घडले ह्याविषयी विविध माध्यमांतून विविध ‘व्हर्शन्स’ प्रसृत होत आहेत. त्यातील अनेकांचा खोटेपणाही कालांतराने स्पष्ट होत आहे. ह्या पार्श्वभूमीवर आम्ही घटनेनंतर प्रत्यक्ष जे एन यु त जाऊन वेगवेगळ्या लोकांशी बोलून श्री. जयंतकुमार सोनवणे ह्यांनी बनविलेला ‘ग्राउंड झिरो रिपोर्ट’ या अंकात मुद्दाम प्रकाशित करत आहोत. तो सत्याच्या अधिक जवळ जाणारा आहे, असा आमचा विश्वास आहे. रोहित, जे एन यु, अलिगढ विद्यापीठ – ह्या साखळीतील महत्त्वाचे सूत्र आजच्या शिक्षणपद्धतीची दिशाहीनता हे आहे. ह्या पार्श्वभूमीवर ह्या अंकातील बाळकृष्ण पिशुपती ह्यांचे मुंबई विद्यापीठाच्या दीक्षांत समारंभातील भाषण आमच्या वाचकांना नक्कीच महत्त्वाचे वाटेल. ह्या वर्षीचा दुष्काळ फार कठीण असणार आहे, ह्याच्या खाणाखुणा उन्हाळा लागण्यापूर्वीच दिसू लागल्या आहेत. पण त्याहून गंभीर बाब ही की सरकार व समाज ह्या दोघांच्याही विचारतालिकेवर हा विषयच नाही. संवेदनांचा हा दुष्काळ ही नैसर्गिक दुष्काळाहून अधिक गंभीर समस्या आहे. शेतीविषयातील कृतीशील विचारवंत श्री. वसंत फुटाणे ह्यांनी मराठवाड्यात फिरून केलेल्या दुष्काळाच्या पाहणीचा अहवाल तुम्हाला नक्कीच अंतर्मुख करेल. आंतर्राष्ट्रीय महिला दिनाचे औचित्य अधोरेखित करणारी कविता व नव्या पिढीच्या वागण्यातून प्रतिबिंबित होणारे स्त्री-पुरुष नात्यातील मोकळेपण मांडणारा ‘अनुभव’ बऱ्याच वाचकांना ‘आपलासा’ वाटू शकेल.

‘आजचा सुधारक’ची ही धडपड तुम्हाला कशी वाटते हे editor.sudharak@gmail.com वर अवश्य पाठवा. हे मासिक प्रतिकूल परिस्थितीत तगून राहावे असे वाटत असेल तर आपल्या वर्गणीचे नूतनीकरण करणे, तसेच नवे वर्गणीदार मिळवून देणे हे तुम्हाला करायलाच हवे. विवेकवादी निव्वळ बोलघेवडे नसतात हे सिद्ध करणे आता तुमच्या हातात आहे.

***

# मराठवाड्यातील दुष्काळ : एक आकलन

*वसंत फुटाणे*

मृदसंधारण, गरजा आधारित पीक पद्धती, नैसर्गिक शेती

---

तीन दशकांपासून स्वावलंबी, पर्यावरणस्नेही शेती करणाऱ्या 'कर्त्या' विचारकाने मराठवाड्यातील दुष्काळाची प्रत्यक्ष पाहणी करून लिहिलेला हा लेख दुष्काळाच्या भीषणतेचे चित्रण करून त्यामागील राजकीय-आर्थिक-पर्यावरणीय राजकारणही उलगडून दाखवितो. सोबतच ह्या आपत्तीच्या निवारणासाठी कंटूर बांधबंदिस्ती आणि कंटूर पेरणी, पीकपद्धतीत बदल असे उपायही सुचवितो.

---

पाण्याशिवाय माणूस, पशुपक्षी कसे जगतील? मराठवाड्यातील तांबवा (ता. केज. जि. बीड) गावात याची प्रचीती आली. एका अध्यापकाच्या तरुण मुलाने चहासाठी बोलावले होते. त्याच्या घरासमोर ३०० फूट खोल ट्यूबवेल होती. दिवसभरात ३-४ घागरी पाणी मिळते म्हणे. त्या घरातील पाणी इतके कडवट होते की घोटभरही घशाखाली गेले नाही. असे पाणी पिऊन हे लोक कसे जगत असतील?

गावाला टँकरने पाणीपुरवठा होतो. माणशी फक्त २० लिटर. काही गावांत २०-२० किलोमीटर लांबून टँकर येतात. केज तालुक्याचे गाव असूनही टँकरग्रस्त. यापायी किती डिझेल रोज जाळले जाते? पाईपलाईन सारख्या स्थायी उपाययोजना नाही का होऊ शकत?

सोनवळा, जि.बीड हे डोंगरपट्टीतले गाव. तेथेसुद्धा पाणी विकण्याचा व्यवसाय आहे. २०० रुपयात ५०० लिटर, ऑटोवाले आणून देतात. पाण्याचा खर्च किमान महिना १००० रुपये. आंबेजोगाईत नळाला पाणी ३ आठवड्यांतून एकदा येते; दुकानात टँकरचे दर लिहिलेले आहेत. तांबवा गावातील ६०० झाडांची डाळिंबाची तरुण बाग पाण्याअभावी शेवटचे आचके घेत होती. तेथील ग्रामपंचायतीत 'केंद्र शासन भूसंधारण विभाग पुरस्कृत, एकात्मिक पाणलोट विकास कार्यक्रम पाणलोट समिती IWMP 28 MR 06' असा फलक होता. भिंतीवर लिहिले होते, *पाणलोटाची यशस्वी कथा, कामे करू माथा ते पायथा.*

परंतु हा कार्यक्रम राबविला गेल्याची चिह्ने गावात दिसली नाहीत. पाणलोट व्यवस्थापनामध्ये प्रत्येक शेतात दोन दशांश (०.२)% उताराचे समोच्चपातळी (कंटूर) बांध ही अतिशय महत्त्वाची, मूलभूत बाब आहे. डाळिंबाच्या बागेत पाणलोट व्यवस्थापन झाले असते तर परिस्थिती वेगळी राहिली असती. गावकऱ्यांना पाणलोट व्यवस्थापनाची काहीच माहिती नसावी. Compartment बंडिंग म्हणजे शेताच्या चतुःसीमा उंच करण्याची कामे काही शेतांमध्ये झाली आहेत. पाणलोट व्यवस्थापनाच्या दृष्टीने अशी कामे अनावश्यकच नव्हे तर कधीकधी जमिनीची धूप वाढविणारी सुद्धा ठरतात.

**माती अडवा पाणी जिरवा**

बीड, उस्मानाबाद मध्ये काही भागांत तीव्र उताराच्या जमिनी असल्यामुळे भूक्षरणाचा वेगही अती आहे. माथ्यावरची माती सखल भागात, तेथून नदी नाल्यांत वाहून जाते. हे शेतकऱ्याचे, देशाचे कायमचे नुकसान आहे. पाऊस यंदा नाही आला तर पुढील वर्षी येऊ शकतो. मात्र एकदा वाहून गेलेली माती शेतात परत आणणे अशक्य आहे. खडकापासून मुरूम, मुरुमापासून  माती असा प्रवास करत एक से.मी. मातीचा थर तयार व्हायला सुमारे १०० वर्षे लागतात. तळी, धरणा-बंधाऱ्यामधील गाळ काढून आणणे अत्यंत खर्चिक आहे; शेतातील माती जागीच अडविणे सहज, सोपे नैसर्गिक आहे. मराठवाड्यातील माती वाचली पाहिजे. शेतात जिथल्या तेथेच माती अडली तर त्याआधारे पाऊसही जमिनीत जिरेल. त्यासाठी हवी अचूक कंटूर पद्धतीची बांधबंदिस्ती. पण ती कुठेच झाली नाही. तरीही आमदार म्हणतात, “कंटूर बांधबंदिस्तीची कामे पूर्ण झालीत. कोठेच जागा उरली नाही.” याला काय म्हणावे?

कंटूर बांधबंदिस्तीचे महत्त्व शेतकऱ्यांना पटवून देण्यासाठी व्यापक मोहीम आखावी. शेतकरी आपापल्या शेतातच रोजगार हमी अंतर्गत ही कामे करू शकतात. बिनचूक कंटूर आखणीसाठी प्रशिक्षित माणसे लागतील. महिना-पंधरा दिवसांतच स्थानिक तरुण मुला-मुलींना यासाठी प्रशिक्षण देता येईल. पाणलोट-व्यवस्थापन कार्यक्रमात हे सारे अंतर्भूत आहेच. यातून तात्कालिक आणि दीर्घकालिक दोन्ही प्रकारचे उपाय साध्य होतात. मात्र यात टेंडर काढण्याची सोय नाही, ट्रॅक्टर, जे.सी.बी. मशीनची गरज नाही, म्हणून टेंडरमध्ये स्वारस्य असणाऱ्यांना  हा कार्यक्रम नीरस वाटतो. शेततळी या कार्यक्रमाचा शेवटचा

टप्पा आहे. मात्र सुरुवात तेथूनच होताना दिसते. माथा ते पायथा ऐवजी पायथा ते माथा. अंधेर नागरी चौपट राजा!

पाणलोट व्यवस्थापनाचा कारभार विदर्भातही फारसा वेगळा नाही. मात्र यवतमाळ, अमरावती, नागपूर, वर्धा जिल्ह्यातील मोजक्याच का होईना, शेतकऱ्यांनी कंटूर बांधबंदिस्ती केली आहे. त्या शेतांना पुढाऱ्यांनी, जागृत शेतकऱ्यांनी भेटी देऊन पाणलोट-क्षेत्र-नियोजन म्हणजे काय ते नीट समजून घेतले पाहिजे. शेतात वाहून जाणाऱ्या पावसाचा वेग मंद करायचा, धावणाऱ्या पाण्याला चालवायचे, चालणाऱ्याला अडवायचे. त्यामुळे मृदा-संधारण उत्तम प्रकारे होऊन जमिनीचा पोत टिकतो. त्याला सेंद्रिय पदार्थांची जोड मिळाली, काडीकचरा-पालापाचोळा जेथल्या तेथेच मुरला की मातीची सुपीकता वाढते. शेतात माती अडवायची आणि शेताबाहेर पाणी.

**पशुधनाशिवाय शेती अशक्य**

चारा-छावणी हा गुरांना शासनाच्या आर्थिक साहाय्याने चारा-पाणी उपलब्ध करून देण्याचा उपक्रम आहे. यात स्वयंसेवी संस्था, स्थानिक उत्साही जनतेचा उत्स्फूर्त सहभाग ज्या प्रमाणात असेल त्या प्रमाणात उपक्रम सफल होईल. ''जनावरे हातची गेली तर शेतकरी उठणारच नाही. ट्रॅक्टर लहान शेतकऱ्यांना परवडणार नाही, बैल लागणारच.'' आमदार श्री. मधुकरराव चव्हाण (माजी मंत्री) तुळजापूरच्या बैठकीत म्हणाले. ''चारा छावणीची योजना अव्यवहार्य आहे. १० लाख जमा करा, २० लाखांची बँक ग्यारंटी द्या. गुरांमागे ७० रु. मंजूर आहेत. त्यापैकी शेणाची किंमत आणि इतर वजा करून ६० रु. मिळणार. ते सुद्धा महिनाभराने.'' बीडमध्ये एका चाराछावणीत ५ लाख डिपॉझिट सांगितले गेले. कुंबेफळ (ता. केज. जि. बीड) मध्ये बैठकीत शेतकरी बोलला. चारा-छावण्या पुढाऱ्यांच्या आहेत. स्वयंसेवी संस्थांनासुद्धा डिपॉझिट ठेवायला सांगितले. कोणाजवळ एवढे पैसे आहेत? एक अधिकारी म्हणाला ''राजकारण्यांसोबत जास्त पंगा घेता येत नाही, आम्ही फक्त टॅग मोजणार .''

**गुरांच्या छावण्या** - 'मानवलोक' चे श्री. लोहिया म्हणाले. ''दिवसा गुरे शेतकऱ्यांकडे आणि रात्री छावणीत असावीत. पंचक्रोशीतील गुरे अशा छावण्यांत असतील.'' सध्याच्या व्यवस्थेत शेतकरी आपल्या गुरांच्या देखभालीसाठी दिवसभर तेथे बसून असतो. त्यांना रसद पुरवणारी वेगळी माणसे

लागतात. मानवलोकने असा यशस्वी प्रयोग मागील दुष्काळात केला. शासनाकडे तेव्हाचे १ लाख रुपये अजून थकित आहेत. गेल्या ३ वर्षांत अर्धे पशुधन खाटकाकडे गेले. शेतकरी आशावादी आहेत, पुन्हा विकत घेऊ म्हणाले. पण एवढी गुरे तरी येणार कोठून? शेतकरी २ हजार रु. टनाने उसाची वैरण घेऊन गुरांना खाऊ घालतोय. त्याने त्यांचे आरोग्य बिघडत आहे. ज्वारीचा कडबा गुरांसाठी उत्तम वैरण आहे. मात्र, ऊस, सोयाबीन या नगदी पिकांपायी ज्वारीचा पेरा खूपच घटला आहे. वैरण कोठून आणणार? आज ज्या जलयुक्त शिवारयोजनेचा महाराष्ट्रात डंका पिटला जातो, तिच्याबद्दल भूगर्भजलसर्वेक्षण आणि विकासयंत्रणेने प्रतिकूल अहवाल दिल्याचेही ते म्हणाले.

**पीकपद्धती** - ज्वारी, बाजरी, मटकी गुरा-माणसांना जगवणारी पिके आहेत. अवर्षणप्रवण, हलक्या जमिनीसाठी ती अत्यंत अनुकूल आहेत. परंतु हे आपण समजून घेतले नाही. आधी उसाने मराठवाड्याची वाट लावली. आता सोयाबीन. कृषिखाते सोयाबीनचा प्रसार करत आहे, तो मुख्यतः कारखान्यांसारखीच. सोयाबीनचे तेल निघत असले तरी त्यातील मुख्य उत्पादन पेंड आहे. सोयाबीन पेंड विदेशात जाते. त्यातून डॉलरमध्ये कमाई होते. सोयाबीन तेल मानवी आहारासाठी निकृष्ट असले तरी भारतीयांच्या नशिबी तेच आले. सतत सोयाबीन पेरल्याने फोस्फरस, सल्फरची उणीव निर्माण होते; मध्यप्रदेशमध्ये ६० चे दशकापासून सोयाबीनची लागवड सुरू आहे. या पिकापायी तिकडचा शेतकरी नागवला गेला आहे. मराठवाड्यातील शेतकऱ्यांनी राजकारण्यांच्या नादी न लागता यातून काहीतरी धडा घ्यावा.

सोयाबीन लवकर तयार होणारे पीक आहे. त्यामुळे शेतकऱ्याचा कल सोयाबीनकडे असतो. परंतु सोयाबीन जमिनीला देते किती आणि जमिनीतून उचलते किती याचा हिशेब होणे आवश्यक आहे. तूर, बरबटी, भुईमूग, मूग, हरभरा, मटकी, लाख-लाखोळी अशी द्विदल पिके जमिनीला किती जैवभार (पालापाचोळा) परत करतात आणि त्या तुलनेत सोयाबीन पेरल्यास काय होते याचा पडताळा घेतल्यास शेतकऱ्यांचा भ्रम दूर होईल. सोयाबीनची पेंड भारतीय गुरांच्या वाट्याला येत नाही. विदेशातील गुरे लवकरात लवकर धष्टपुष्ट करण्यासाठी ती वापरली जाते. भारतात ही पेंड वापरली गेली असती तर भारतीय शेतात खतरूपात परत मिळून निसर्गाचे चक्र पूर्ण झाले असते. १९६०

चे दशकात सोयाबीन लोकप्रिय करण्यासाठी भरपूर भाव दिले गेले. आज भावही मिळत नाही.

"बीड जिल्ह्यात सर्वाधिक म्हणजे एकूण १२ साखर कारखान्यांपैकी ८ बंद आहेत. त्यांनी जिल्हा सहकारी बँक खाऊन टाकली आणि शेतकऱ्यांचेही पैसे बुडविले. हे कारखाने नसते तर शेतकरी उसाकडे वळला असता काय?" एक सामाजिक कार्यकर्ता म्हणाला. "ऊस, कापूस, सोयाबीन नाही तर काय पेरावं?" असा प्रश्न शेतकऱ्यांच्या बैठकीत तावात येऊन विचारला गेला. पहिली गोष्ट ही की बाजार शेतकऱ्याला नाचवतो. चार पैसे अधिक मिळतील तिकडे शेतकरी धावत सुटतो. उदा. तुरीचा डिसेंबर अखेरीस भाव १३ हजार रु. प्रति क्विंटल असताना जानेवारीच्या पहिल्या प्रथम सप्ताहात तो रु.८ हजार पर्यंत उतरतो, तर त्याला कसली शाश्वती? दुसरीकडे कांदा कधी हसवतो, तर कधी रडवतो.

**महात्मा गांधी राष्ट्रीय रोजगार हमी योजना (मनरेगा) – आजची स्थिती**

"सर्वाधिक निधी या योजनेमधून खर्च होतो. मृदा व जल यांच्या संधारणाच्या कामाला यात प्राधान्य आहे. मात्र रस्त्याची मागणी अधिक आहे." एक अधिकारी म्हणाले.

"रोजगार हमी योजना गरजूंना माहीतही नसते. मजुरांची कामे जे.सी.बी. मशीनने करत आहेत. बेरोजगारीला कंटाळून परवा लोकांनी रस्ता बंद पाडला." उस्मानाबाद मधील कार्यकर्ते सांगत होते.

"मजुरांनी कामं मागावी, गुत्तेदारांनी नाही." एक तहसीलदार बोलले.

"मनरेगासाठी वेगळी यंत्रणा पाहिजे. नेहमीची कामे मागे पडतात." केजचे खंडविकास अधिकारी म्हणाले.

जॉबकार्डसाठी लोक हेलपाटे घेत आहेत. ते न मिळाल्याच्या जागोजागी तक्रारी आहेत. काम मागण्यासाठी ४ क्रमांकाचा अर्ज भरावा लागतो. अशा अर्जावरील पुढील प्रक्रियांसाठी ३-४ डाटा ऑपरेटर्सची गरज असताना तालुक्यात फक्त एक जण काम करतो. गुत्तेदारांनी बेनामी नावांनी मस्टर भरले. इतकेच नव्हे तर त्यांचे ATM कार्ड वापरून पैसेही काढले. लोकांना काही काम न करता १००-२०० रुपये मिळतात. तेही त्यांच्यासाठी खूप आहेत. रोजगार हमी योजनेअंतर्गत विहीर पुनर्भरण उपाययोजना आहे, परंतु शेतकरी या योजनेबाबत उदासीन आहेत. विहिरींची मागणी जास्त आहे. पण या विहिरींमध्ये पाणी येणार

कोठून? आधी भूजलसंवर्धन करावे लागेल. अशी मन विषण्ण करणारी वस्तुस्थिती आहे.

**दुष्काळ संवेदनांचा**

महानंदा डावकरे, आर्णी, ता. लोहारा, जि. उस्मानाबाद या प्रौढ महिलेला ४ महिन्यांपूर्वी दगड फोडताना डोळ्याला इजा झाली. दवाखान्याचा खर्च ४० हजार रु. आला. सोलापूरचे नेत्रतज्ञ डॉ. अवस्थी यांनी पैसे फेडायला मुदत दिली. उधार उसनवारी करावी लागली. या प्रसंगी बाईला त्या दिवशी कामावर गैरहजर दाखविले गेले. ४० हजाराचे कर्ज झाले, रोजीही बुडाली. नुकसान-भरपाई काहीही नाही. दुसऱ्या एकाच्या पायाला गंभीर इजा झाली. त्यालासुद्धा नुकसानभरपाई मिळाली नाही.

एका आमदाराने सांगितले की व्यसनात २०% पैसा चाललाय. त्यामध्ये २५-३० वयोगटातील तरुणांची संख्या सर्वाधिक आहे. नागूर, ता . लोहारा, जि. उस्मानाबाद हे मध्यम लोकसंख्येचे गाव. तेथे ८-१० विधवा महिलांसोबत बैठक झाली. त्यातील बहुतेक २५-३० वयोगटातील होत्या. एक तर २५ च्या आतील, दोन मुलांची आई. नवरा कशाने मेला म्हणून विचारल्यावर म्हणाली, "माहीत नाही. पोटात दुखते म्हणाला." ही महिला उभे आयुष्य कसे रेटणार? या परिसरात ऊसतोडणी कामगार वा ट्रक ड्रायव्हर म्हणून पुण्याकडे स्थलांतर करणाऱ्यांची संख्या खूप आहे. एका घरात नणंद-भावजय, सासू-मावस सासू साऱ्या विधवा किंवा एकट्या, एकमेकींच्या आधाराने राहतात. मोलमजुरी करून जगतात. कैकाडी समाजाची पस्तिशीची एक विधवा, तिला चार मुली. पैकी तीन विवाहित. ह्या वयात ती अनेक नातवांची आजी आहे हे ऐकून धक्काच बसला. सिंदीच्या फोकाच्या टोपल्या विणण्याचा त्यांचा व्यवसाय. प्लास्टिकमुळे तो बुडाला. रेखाबाईची कहाणी वेगळीच. वय ३०ते ३५. तिचा पती राजेंद्र. त्याला सुपारी खाऊन ठसका लागला. त्यानंतर त्याच्या कॅंसरचे कळले. काही वर्षांतच त्याचा जीव गेला. मुलगा ८ वीत, मुलगी १० वी शिकलेली. तिचे लग्न करून दिले तर दोन लाख हुंडा द्यावा लागला. लग्नासाठी ४ लाख रु. कर्ज काढले. व्याज ३ रु. शेकडा प्रति महिना. हा कर्जाचा डोंगर किती वाढेल? 'एवढा हुंडा कशाला दिला?' असे विचारले तर भावकीच्या इच्छेनुसार करावे लागते हे उत्तर.

तांबव्याचा तरुण म्हणाला, "तुमच्याकडे माणसे अदबीने बोलतात. इकडे

मग्रूरी आहे. त्यापायीच जनतेने आमदाराला आपटला." तुळजापुरातील एका गावात याची प्रचीती आली. सरपंचाचे पती सभेत सर्वांत शेवटी आले. वय अंदाजे ३५. एकूण आविर्भाव जमीनदाराचा. वयोवृद्धांनाही अरे-तुरे करत होते. सौम्य स्वरूपात का होईना, दमदाटी चाललेली. रेकॉर्डमध्ये पिन अडकल्यासारखे बोलत होते. मराठवाड्याच्या संतभूमीतही निजामशाही रक्तात मुरली म्हणायची!

**कर्जाचे पुनर्गठन**

कर्जाचे पुनर्गठन म्हणजे घेतलेले परत केल्याची कागदोपत्री नोंद करून तेच कर्ज पुन्हा घेतल्याचे दाखविणे. सोनवळा, ता. आंबेजोगाई, जि. बीड, सहकारी पतसंस्थेचा अध्यक्ष सांगत होता. जे लोक कर्जाचे पुनर्गठन करायलाही येत नाहीत, अशांची नावे जाहीर केली जातात. शेतकरी एवढा बेजबाबदार कसा की त्याच्या फायद्याचे असूनही तो दुर्लक्ष करतो? प्रश्न असा आहे की कर्जाचे पुनर्गठन नक्की कोणाच्या फायद्यासाठी -- बँकांच्या की शेतकऱ्यांच्या? नागूर, ता. लोहाराचे नेताजी चंदनशिव, दत्ताजीराव चंदनशिव आणि जवळपास सर्वच गावकरी उस्मानाबाद जिल्हा मध्यवर्ती सहकरी बँकेचे कर्जदार असून कर्जाच्या पुनर्गठनाबाबत नाखुश आहेत. १२,००० सह्यांचे निवेदन दिले, तरीही पुनर्गठन सुरूच आहे. एकजण म्हणाला, "कर्ज ही कॅन्सरसारखी बिमारी आहे."

दुसरा म्हणाला, "दोन लाख रुपये पाईपलाईनमध्ये घातले. पण तेव्हापासून धरणच नाही भरले. कर्ज अंगावर बसले." गेल्या ३-४ वर्षांपासून दुष्काळ आहे. बकऱ्या, बैलगाडी विकली. गुरे कत्तलखान्याकडे चालली. 'शेती का परवडत नाही' विचारल्यावर कुंबेफळचा शेतकरी म्हणाला, "घरचे बी-बियाणे नाही, लेबल लावून काय देतात माहीत नाही."

अमावास्येनिमित्त नागूरला एका शेतात जमलो होतो. "बुद्धिजीवींनी किमान आम्हा शेतकऱ्यांचा सहानुभूतीने विचार करून बुडत्याला आधार तसा मदतीचा हात द्यावा. सरकारी आकडेवारीतून दिसणारे चित्र हे हिमनगाचे टोक आहे. स्वामिनाथन आयोग लागू करणे शक्य नाही. सर्वोच्च न्यायालयात सरकारने निवेदन दिले आहे." एका सुजाण शेतकऱ्याचे निवेदन.

रोजगार हमी योजनेत रस्त्याचे काम सुरू झाले आहे. त्यावर १०० पेक्षा जास्त मजूर आहेत. गावातील प्रभूआप्पा शिंदेंना विचारले, जलसंधारणाचं काम नाही काढलं? ते म्हणाले, "खरे तर बंधाऱ्याचीच कामे गरजेची आहेत.

आमच्या परिसरातून ३ शिवारांत पाणी जातं, येत काही नाही. पाणी अडवणे-जिरवणे महत्त्वाचे आहे.” पुढे ते म्हणाले, “१९७२ साली अन्नाचा दुष्काळ होता, पाणी होतं.” आता दुष्काळ पाण्याचा आणि मुख्यत्वे संवेदनांचा आहे. अशी शहाणी विचारी माणसं गावात आहेत. त्यांच्या मदतीने योजना आखाव्या आणि राबवाव्या लागतील.

एका गावात अन्नछत्रासारखा उपक्रम पाहिला. १८-६० वयोगटातील लोकांनी त्या बदल्यात महिन्यातून फक्त ५ दिवस श्रमदान करायचे. निर्वासितांच्या शिबिरासारखे दृश्य. ते पाहून अंगावर काटा आला. अनेक गावांतून अशी मागणी येत आहे म्हणे. माणूस आपला आत्मसन्मान तर नाही गमावून बसणार?

‘दुष्काळात शेतकरी आधी झाडझाडोरा, नंतर गुरं विकतो’ एक शेतकरी बोलला. एक भली मोठी बाभूळ ट्रॅक्टर ट्रॉलीमधून वाहून नेली जात होती. तिचं आयुष्य अर्धं शतक तरी असावं. गुरांसारखीच तीही खाटकाकडे गेली. तिने आतापर्यंत गुरा-माणसांची किती सेवा केली असेल? पावसाचे पाणी तिच्या आधाराने किती मुरले असेल, कोण हिशेब करणार? कलकत्ता विद्यापीठाचे डॉ.तारक मोहन दास यांनी १९८१ साली वाराणसीला भरलेल्या भारतीय विज्ञान काँग्रेसमध्ये एका झाडाची किंमत Value of A Tree प्रबंध सदर केला होता. धोरणकर्ते, प्रशासक, अभ्यासक, पत्रकार, शेतकरी अशा ज्यांना ज्यांना ‘भारत माझा देश आहे’ असे वाटते, त्यांनी त्यांनी तो अभ्यासावा. खाटकाकडे जात असलेल्या बाभळींचे महत्त्व तो प्रबंध वाचून कळेल. बोरी-बाभळीवर प्रेम केलं नाही तर मराठवाड्याची खैर नाही. तेथील जमीन नारळ-फणसाची नाही. तसेच होलस्टीन, जर्सी गायी आपल्याला परवडणाऱ्या नाहीत, देशी गोवंशच हवा. काँक्रीटची जंगले सर्वत्र उभी होत आहेत. पिढ्यानपिढ्या चालणाऱ्या दगडमातीच्या बांधकामांना ‘मूठमाती’ दिली जात आहे. चारचाकीचा सुळसुळाट आहे. पर्यटन, हॉटेल व्यवसाय भरभराटीला आलेत. खिशात पैसा असेल तर काहीच अडत नाही. मराठवाड्याच्या दुष्काळी भागातही हेच चित्र आहे. एकीकडे २५ वर्षांची दोन लेकरांची विधवा माता आणि दुसरीकडे पंच-सप्त तारांकित दुनिया. राजकारणी व ठेकेदारांची युती. जोडीला बहुराष्ट्रीय कंपन्यांची माणसे.

सन १९७२ मध्ये देशात दुष्काळ पडला होता. जयप्रकाश नारायणांच्या पुढाकाराने तेव्हा 'अकाल बनाम तरुण' (Youth Against Famine) ही मोहीम राबवली गेली. दुष्काळी भागात जाऊन विद्यार्थी-युवकांनी सेवा केली. त्यातून एक पिढी घडली. आता सारे खुर्चीच्या खेळात दंग आहेत. शाळांमध्ये रोज भारतमातेचा जयजयकार होतो. तेथील दुष्काळाशी कोणाला काय देणे-घेणे? ऐंशीच्या दशकात विठ्ठल वाघांची कविता सर्वत्र गायली जायची.

'आम्ही मेंढरं मेंढरं, यावं त्यानं हाकलावं
पाचा वर्साच्या बोलीनं होते आमचा लिलाव'

आणीबाणीच्या काळात दुर्गा भागवतांचे साहित्य संमेलनातील अध्यक्षीय भाषण गाजले होते. आता राजकीय पुढारी साहित्य संमेलनाच्या व्यासपीठावरून साहित्यिकांना विनोदाने का होईना सल्ला द्यायला लागलेत. 'निवडणुका लढवणं तुमचं काम नाही, ते आमच्यावर सोडा.' साहित्य पिढ्या घडवत असते. पी.साईनाथचे 'Everybody Loves A Good Drought' (दुष्काळ आवडे सर्वांना,अनुवाद-हेमंत कर्णिक,अक्षर प्रकाशन) हे नव्वदच्या दशकातील गाजलेले पुस्तक. आजही त्यातील वर्णन जसेच्या तसे लागू होते. ते लिहितात -

*"एका १९९४-९५ सालात महाराष्ट्र या श्रीमंत राज्याने अवर्षण आणि इतर पाणी प्रश्नांच्या सोडवणुकीसाठी ११७० कोटी रुपयाहून अधिक रक्कम खर्च केली. ड्रोट प्रोन एरिया प्रोग्राम (डी पी ए पी) नावाची योजना आहे. पण कोठला ब्लॉक डीपीएपीत सामील करावा हा राजकारणाचा विषय आहे.........कितीतरी राज्यांतील डीपीएपीची अधिकृत आकडेवारी चित्तवेधक आहे. सहा वर्षांपूर्वी महाराष्ट्रातील डी पी ए पी ब्लॉक्सची संख्या होती नव्वद, १९९६ मध्ये ही संख्या आहे १४७....(पृष्ठ २६१). ...महाराष्ट्राचं उदाहरणं घेऊ. त्या राज्यात पिकणाऱ्या एकूण उसापैकी जवळजवळ ७३% ऊस डीपीएपी ब्लॉक्समध्ये म्हणजे अवर्षणग्रस्त जिल्ह्यामध्ये पिकतो! आणि उसाएवढं पाणी खाणारं दुसरं पीक नसेल... पुण्याजवळ लोणावळ्यात वर्षभरात पाऊस १६५० मिमीच्या खाली क्वचित असतो. अगदी २००० पर्यंत देखील जातो आणि लोणावळा हा डीपीएपी ब्लॉक आहे. ..सगळ्या पाण्यावर धनदांडग्यांचा कब्जा (पृ.२६२-६३)"*

परिणीता दांडेकर या शोधकर्तीनुसार मराठवाड्यात ऊस-लागवड २,३७,००० हेक्टरमध्ये असून त्यासाठी ६१ साखर कारखाने आहेत. मराठवाडा

आणि सोलापूर जिल्हा मिळून महाराष्ट्राच्या एकूण साखर-उत्पादनापैकी $^{२}/_{३}$ उत्पादन करतात. मराठवाड्यात उसाच्या पिकासाठी ४३०० दशलक्ष घनमीटर तर त्याच्या गाळपासाठी १७ दशलक्ष घनमीटर पाणी लागते. एवढ्या पाण्यात १५ लाख ८५ हजार लोकांची पिण्याच्या पाण्याची गरज मान्सूनपर्यंत भागू शकते.

**पुनश्च** - दि. २६ जानेवारी २०१६ रोजी परभणी जिल्ह्यातील एका गावात ग्रामसभेत गोळीबार झाला. 'मनरेगा' बाबत विचारणा केली असता उपसरपंचाच्या पतीने पिस्तुलातून गोळ्या झाडल्या. अनेक लोक जखमी झाले.

बिहार मध्ये कोसी नदीच्या पूर नियंत्रणासाठी ज्या योजना वर्षानुवर्षे राबविल्या गेल्या, त्या एका महापुढाऱ्याने गिळंकृत केल्या. कोसी आणि जनता होते तसेच आहेत. (रिपोर्टींगचे दिवस : अनिल अवचट) मराठवाड्यातील मनरेगा योजनेच्या अंमलबजावणीत जागोजागी गंभीर तक्रारी आहेत. महाराष्ट्राची वाटचाल बिहारच्या दिशेने तर होत नाही? ऊस गोड लागला म्हणून मुळासकट खाल्ला अशी अवस्था आहे.

अशा परिस्थितीत काही आशेचे किरणही आहेत. एक हजार लीटर पाण्यात कापूस, तूर, भाजीपाला, ज्वारी, आंबा असे गरजेपुरते सर्व दीड एकर शेतीत स्वतः राबून पिकवणारे कुटुंब सोनवळात, आंबेजोगाईत दिसले. त्यांचा आदर्श शेतकरी म्हणून त्याचा सत्कार झाला पाहिजे. दुसरा एक तरुण शेतकरी सांगत होता की एका घनिष्ठ मित्राकडे ज्वारी घ्यायला गेलो असताना तेथील म्हातारीने फटकारले. "तू शेतकरी आहेस. ज्वारी मागायला तुला लाज नाही वाटत? स्वतः का नाही पेरत? "

**उपाय काय ?**

परावलंबी शेतीपद्धतीची भरपूर किंमत शेतकऱ्याने चुकविली आहे. त्याला स्वावलंबी, स्वाश्रयी शेतीतंत्र हवे आहे. सेंद्रिय/ नैसर्गिक शेतीकडे वळण्याची हीच योग्य वेळ आहे. त्यासाठी कोण शेतकऱ्याला खरीखुरी मदत करणार? शासनाने आपली धोरणे या कामी पूरक ठेवली तरी पुरे.

यावर सगळ्यात महत्त्वाचा उपाय म्हणजे गरजा-आधारित पीक-नियोजन. कमीत कमी पाण्यात येणारी व जमिनीची सुपीकता वाढविणारीच पिके घ्यावीत. त्यामुळे सोयाबीनला कायमचा रामराम करून त्याऐवजी, भुईमूग पेरावा. भुईमूग जमिनीची सुपीकता वाढविणारा, गरिबांचा काजू आहे. छोटे एक्सपेलर वा

तेलघाणीमधून भुईमूग, करडी, जवस, कारळा इ. चे तेल गाळून विकता येईल. खपली गहू, जवस, लाख-लाखोळी, भगर, बाजरी-ज्वारीचे विविध प्रकार-- वऱ्हाडी, झिंगरी, पिवळी, गुळभेंडी, मऊ हुर्ड्याची इ. परत आणावे लागतील. कवठ, चारोळी, बिब्बा, करवंद, टेंभरूण, बोर इ. फळे देणारी आणि अंजन, रोहण, निंब, बाभूळ, हिवर, खैर इ. गुरांना वैरण पुरविणारी झाडे बांधावर, माळरानावर लावावी लागतील. वृक्षारोपणासाठी खड्डे, नर्सरी इ. कामे ही रोजगार हमीअंतर्गत होऊ शकतात. यातून शाश्वत शेतीविकास व रोजगारनिर्मिती साधेल. मात्र, त्यासाठी हवी शासनाची आणि जनतेची इच्छाशक्ती.

पहिली गोष्ट म्हणजे साखर-कारखानदारी नको. माध्यमांनी याबाबत लोकप्रबोधन करून वरच्या पातळीवर काय चाललेय ते जनतेला सांगावे. देशाची चिंता असलेल्या, अंतिम माणसाविषयी जिव्हाळा असलेल्यांनी शासकीय धोरणांसंबंधी मते व्यक्त करावीत. चांगल्या गोष्टींचा पाठपुरावा करावा.

तेलंगणाने स्वतःला ज्वारी, बाजरी, भगर, नाचणी, सावा इ. भरड धान्य पिकविणारे राज्य  (मिलेट स्टेट) घोषित केले आहे. महाराष्ट्राने त्याचे अनुकरण करावे. यांच्या जोडीला तूर, बरबटी, मटकी, कुळीथ, लाखोळी, हरभरा, उडीद, मूग, मसूर, वाटाणा ही डाळवर्गीय पिके आणि करडी, कारळा, जवस, भुईमूग ही तेलबियांची पिके घ्यावी. यासाठी शासनाने शेतकऱ्यांना आर्थिक प्रोत्साहन आणि बी-बियाणे द्यावे. एवढे केल्यास ऊस-सोयाबीनच्या दुष्टचक्रातून सुटणे शेतकऱ्यांना शक्य होईल. भूगर्भजल वाचेल आणि जमीनही सुधारेल. हलक्या जमिनीत, कमी पावसात येणारी ही पिके आहेत. आंध्रमधील अनंतपूर/ धर्मावरम परिसरात तिंबक्टू  कलेक्टिव  नावाच्या स्वयंसेवी संस्थेने या धान्यावर प्रक्रिया करून नाचणीचे पीठ, बिस्किटे इ. उत्पादने बाजारात आणली. यामुळे शेतकऱ्यांना चांगला भाव मिळाला. मराठवाड्यातही असे घडले पाहिजे.

सिक्किम सारखा मराठवाडा सेंद्रिय हवा. पारंपरिक बियाणे, नैसर्गिक शेती मराठवाड्याला वाचवेल. रसायने आणि अधिक उत्पादन देणारे बियाणे वापरल्यास पिकांची पाण्याची गरज वाढते. याउलट पारंपरिक बियाणे वापरल्यास दुष्काळातही काहीना काही मिळत राहते. गुरांना चारासुद्धा अधिक मिळतो. त्यामुळे, पारंपरिक बियाण्यांना नैसर्गिक शेतीपद्धतीची जोड मिळाल्यास दुधात साखर पडेल.

***

# ग्राउंड झीरो : जे एन यु

*जयंतकुमार सोनवणे*

जे एन यु, देशद्रोह, शैक्षणिक स्वातंत्र्य

---

गेल्या काही आठवड्यांपासून दिल्लीतील जवाहरलाल नेहरू विद्यापीठ -- जे एन यु – सर्वत्र गाजते आहे. तेथील विद्यार्थी संघाचा अध्यक्ष कन्हैया कुमार ह्याला देशद्रोहाच्या आरोपावरून झालेली अटक, तीस हजारी कोर्टाच्या आवारात वकिलांनी त्याच्यावर चढवलेला हल्ला, काही दूरचित्रवाहिन्यांनी व संसेदेच्या व्यासपीठावरून खुद्द सत्ताधारी पक्षाने जेएनयुची देशद्रोह्यांचा अड्डा म्हणून केलेली संभावना व्यथित करणाऱ्या आहेत. सादर आहे ह्या घटनाक्रमाचा जेएनयुत जाऊन मुळापासून घेतलेला आढावा.

---

नवी दिल्लीच्या महरौली-वसंतकुंज भागात वसलेले जवाहरलाल नेहरू विद्यापीठ अर्थात JNU सध्या देशभरात चर्चेचा विषय बनले आहे. अर्थात ते आधी चर्चेचा विषय नव्हते अशातला भाग नाही. ह्या वर्षात ते पहिल्यांदा चर्चेत आले ते केंद्रीय मानव संसाधन मंत्रालयाने उच्चशिक्षणासाठी फेलोशिप बंद केल्याच्या विरोधात विद्यार्थ्यांनी छेडलेल्या “Occupy UGC” ह्या आंदोलनामुळे. दुसऱ्यांदा ते हैदराबाद सेन्ट्रल विद्यापीठाच्या रोहित वेमुला आत्महत्या (?) प्रकरणात केंद्रीय मानव संसाधन मंत्रालयावर विद्यार्थ्यांनी नेलेल्या मोर्चामुळे चर्चेत आले. त्यानंतर दि. ९ फेब्रुवारीच्या संध्याकाळी JNU कॅम्पसमध्ये झालेल्या देशविरोधी घोषणाबाजीमुळे ते पुन्हा एकवार चर्चेचा केंद्रबिंदू बनले. ९ ते १७ फेब्रुवारी ह्या आठ दिवसांत उतावळ्या मिडिया ट्रायल्समधून JNUची जनमानसातील भारतातील सर्वांत नामांकित विद्यापीठ म्हणून लौकिक असलेली प्रतिमा बदलून ‘दहशतवाद्यांचा अड्डा’ अशी झाली. देशात राहणाऱ्या प्रत्येकाला आपापले मत मांडण्याचा, ते प्रदर्शित करण्याचा अधिकार आहे. त्यानुसार अनेकांनी राष्ट्रीय भावनिक लाटेवर स्वार होत मिडिया

ट्रायल्सच्या 'ओ'ला 'हो' जोडत JNU बंद करा म्हणून तगादा लावला. प्रथमदर्शनी या संपूर्ण प्रकाराबाबत एक संदिग्धता वाटत होती, मीडियात ज्या अविवेकी पद्धतीने JNU बाबत वक्तव्ये होत होती (आजही-आताही होत आहेत) त्यामुळे त्या संदिग्धतेला बळकटी प्राप्त होत होती. म्हणून शेवटी संपूर्ण प्रकरण समजावून घेण्यासाठी मी पुन्हा JNU गाठले, ९ तारखेच्या घटनेपासून परवाच्या पटियाला हाऊस कोर्ट मारहाण प्रकरणाच्या अनेक प्रत्यक्षदर्शी विद्यार्थ्यांशी चर्चा केली; त्याचा हा 'ग्राउंड झिरो रिपोर्ट'!

**घटनाक्रम**

मागच्या काही महिन्यांपूर्वी JNU कॅम्पस मधील DSF (डेमोक्रेटिक स्टूडेंट्स फेडरेशन) मधून काही विद्यार्थी वैचारिक मतभेदांमुळे बाहेर पडले, ज्यात ओमर खालिदपण होता. दि. ९ फेब्रुवारी रोजी संध्याकाळी साडेपाच वाजता साबरमती हॉस्टेलसमोरील पटांगणावर ओमर खालिद आणि त्याच्या सात ते आठ सहकाऱ्यांनी "Country without Post Office" हा सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित केला होता ज्यात 'Debate on Judicial Killing' हा एक वादविवादाचा मुद्दा ठेवण्यात आला होता. विद्यापीठाच्या नियमानुसार अटींची पूर्तता करण्याचे वचन देऊन दि. ७ रोजी सकाळी कुलगुरूंच्या कार्यालयातून या कार्यक्रमाला परवानगी दिली गेली. त्याच दिवशी दुपारपर्यंत ह्या कार्यक्रमाचे आयोजक असलेल्या आठ ते नऊ विद्यार्थ्यांच्या नावे आणि सहीचे प्रसिद्धिपत्रक JNU मध्ये वाटले गेले. ('Country without Post Office' हा काश्मिरी वंशाचे अमेरिकन कवी आगा शाहीद अली यांचा कवितासंग्रह आहे.) कार्यक्रम सुरू होण्याच्या एक तास आधी कुलगुरु कार्यालयातून हा कार्यक्रम रद्द करण्याची सूचना आली, आयोजकांनी कुलगुरूंना याबाबत विचारणा केली असता ABVP ने यासंदर्भात तक्रार केली असल्याचे निष्पन्न झाले. यावर कुलगुरु कार्यालयातून एक कारण देण्यात आले ते म्हणजे 'ह्या कार्यक्रमादरम्यान अनुचित प्रकार घडण्याची संभावना आहे, यामुळे परवानगी नाकारण्यात येत आहे.' पाच वाजता कार्यक्रमाच्या नियोजित स्थळी जमलेल्या काश्मिरी विद्यार्थ्यांमध्ये त्यामुळे संतापाची भावना तयार झाली आणि त्यांनी त्यांच्या विशिष्ट पद्धतीने शिट्ट्या मारत झालेल्या प्रकाराबाबत निषेध व्यक्त

करायला सुरुवात केली. त्याचवेळी तेथे आधीपासून उपस्थित असलेल्या ABVPच्या गटातून "अफजल जैसी मौत मरा, तुम्हें भी वैसी मौत मारेंगे", "कश्मीरी देश के गद्दार हैं, उन्हें पाकिस्तान भेजो" अशी घोषणाबाजी झाली. प्रत्यक्षदर्शी विद्यार्थ्यांच्या सांगण्यानुसार काश्मिरी गटात आणि ABVP अशा दोन्हीही गटात Non-JNU विद्यार्थ्यांची संख्या मोठी होती. वेळ पुढे सरकत होती तशी वातावरणातील तणाव वाढत होता. त्यानंतर काश्मिरी विद्यार्थ्यांच्या गटातून घोषणाबाजी झाली "अफजल, हम शरमिंदा हैं, तेरे कातिल जिंदा हैं!", "भारत की बरबादी तक, जंग हमारी जारी रहेगी".... ह्या उत्तर-प्रत्युत्तराच्या घोषणाबाजीनंतर काही काश्मिरी विद्यार्थी आणि काही अभाविप कार्यकर्ते यांच्यात झटापट झाली. तेथे उपस्थित असलेल्या अनेक विद्यार्थ्यांनी आणि JNUSU कौन्सिलर्सनी ह्या दोन्ही पक्षांतील विद्यार्थ्यांना घोषणाबाजी रोखण्याची विनंती केली. हा सगळा मुद्दा मीडियाने व्हिडीओसकट संपूर्ण भारतात पोहोचवला. साबरमती हॉस्टेल पटांगणावर झालेल्या ह्या प्रकारानंतर सर्वांत पहिल्यांदा रिपोर्ट्स आले ते 'झी न्यूज' आणि 'आज तक'वर. प्रत्यक्षदर्शी विद्यार्थ्यांच्या सांगण्यानुसार दुपारच्या चार वाजेपासूनच त्या ठिकाणी या वृत्तवाहिन्यांचे कॅमेरे तैनात होते. वर उल्लेख केलेल्या वृत्तवाहिन्यांसहित सर्वच 'पान टपरी छाप' वृत्तवाहिन्यांच्या मीडिया ट्रायल्समधून सरसकट संपूर्ण JNU ला एका रात्रीत 'आतंकवादी' जाहीर करण्यात आलं. यानंतर मुद्दा उठतो तो JNUSU चा अध्यक्ष कन्हैया कुमार याच्या अटकेचा...

## पार्श्वभूमी

पहिल्यांदा JNUSU काय आहे हे समजून घेवूयात. आपल्या शाळा आणि कॉलेजेसमध्ये जसे विद्यार्थिमंत्रिमंडळ असते तसेच जवाहरलाल नेहरू विद्यापीठात विद्यापीठाच्या अधिष्ठात्यांच्या (Dean) कार्यकक्षेअंतर्गत JNUSU-Jawaharlal Nehru University Students' Union ही अस्थायी संघटना बनवली आहे. दरवर्षी विद्यार्थ्यांमधून खुल्या निवडणुकांच्या माध्यमातून ४ मुख्य पदाधिकारी आणि विविध विभागांचे (Schools) ३० कौन्सिलर्स असे मिळून सुमारे ३४ सदस्यांची सदर संघटनेवर निवड करण्यात येते. JNU च्या आवारातील राजकीय-सामाजिक आणि वैचारिक वातावरण निकोप ठेवण्याची

नैतिक जबाबदारी ह्या विद्यार्थी प्रतिनिधींवर असते. सन १९६९ पासून आजपर्यंतच्या ५७ वर्षांच्या इतिहासात JNUSU वर नेहमीच डाव्या विचारसरणीच्या AISF- All India Students' Federation, AISA- All India Students' Association, SFI- Students' Federation of India ह्या संघटनांचे वर्चस्व राहिले आहे. विद्यापीठात काँग्रेसप्रणीत NSUI--National Students' Union of India आणि भाजपाप्रणीत ABVP--अखिल भारतीय विद्यार्थी परिषद् यांचे नाममात्र अस्तित्व आहे. JNUSU च्या चार मुख्य पदाधिकाऱ्यांपैकी अध्यक्ष कन्हैया कुमार हा AISF चा, उपाध्यक्ष शेहला रशीद आणि मुख्य सचिव नागाजी हे दोघेही AISA आणि सहसचिव सौरभ शर्मा हा ABVP चा सदस्य आहे.

९ फेब्रुवारीची घटना घडली त्याठिकाणी म्हणजे साबरमती हॉस्टेल परिसरात कन्हैयाकुमार आपल्या साथीदारांसोबत सहा-साडे सहाच्या दरम्यान पोहोचला. आपली नैतिक जबाबदारी ओळखून त्याने दोन्हीही पक्षाच्या विद्यार्थ्यांना घोषणाबाजी बंद् करण्याची विनंती केली. JNUSU चे कौन्सिलर्स तसेच काही प्राध्यापक आणि विद्यार्थी यांनी मध्यस्थी करून वातावरण शांत केले. साडे पाच ते साडे सात दरम्यान जे काही घडले ते वृत्तवाहिन्यांच्या कॅमेरा मध्ये टिपले गेले आहे. जे स्क्रीनवर पूर्ण आवाजात आणि अनकट स्वरूपात दिसतंय ते सत्य आहे. आणि जर व्हिडीओचा ऑडीओ म्युट न करता, व्हाईसओव्हर न करता ऐकवले जात असेल तर तेही सत्य आहे.

JNU च्या नियमांनुसार कुलगुरूंना मागेल त्याला कार्यक्रमाची परवानगी देणे बंधनकारक आहे. हा आताचा नव्हे, तर विद्यापीठाच्या स्थापनेपासून अखंडित राहिलेला संकेत वा परंपरा आहे. 'Country without Post Office' ची परवानगी का नाकारली याची विचारणा कन्हैयानेदेखील केली असे काही विद्यार्थ्यांचे म्हणणे आहे. अर्थात असे विचारणे हा त्याच्या जबाबदारीचा आणि कर्तव्याचा भाग आहे. कुलगुरु कार्यालयातून मिळालेल्या उत्तराने काश्मिरी विद्यार्थ्यांचे समाधान झाले नाही आणि त्यातल्या त्यात ABVP च्या तक्रारीवरून आपल्याविरोधात सूडभावनेने निर्णय घेतला गेला अशी त्यांची धारणा झाली. वृत्तवाहिन्यांच्या कॅमेऱ्यामागे उभे असलेल्या ABVP च्या कार्यकर्त्यांनी काश्मिरी जनतेविरोधात आणि अफजल गुरु विरोधात घोषणाबाजी

केली आणि वादाची ठिणगी पडली, हे प्रत्यक्षदर्शी विद्यार्थ्यांनीही सांगितले आणि मिडिया फुटेजमधूनही ते स्पष्ट होत आहे. JNU मधील School of Historical Studies मधून M. Phil. करणाऱ्या एका विद्यार्थ्याने सांगितले की कुलगुरु कार्यालयाने JNUSU च्या कौन्सिलर्सला कारण देताना असे सांगण्यात आलं की, "JNU के इन्टेलिजेन्स के अनुसार कोई बड़ी अनुचित घटना की आशंका जताई गई है और उसी के आधारपर सावधानी के तौर पर इस प्रोग्राम की अनुमति रद्द कर दी गई.." मी या विद्यार्थ्याला विचारले की, "क्या आपने इससे पहले ऐसा रीझन कभी सुना है जे.एन.यू. में ?" तर यावर त्याने मानेने नकार दिला, पुढे आश्चर्य व्यक्त केले की "JNU इन्टेलिजेन्स नामकी चीज मैं पहली बार सुन रहा हूं."

घटना घडली ती रात्र, दुसरा, तिसरा दिवस आणि तिसऱ्या रात्रीच्या बारा वाजेपर्यंत कन्हैया कुमार, शेहला रशीद, नागजी आणि सौरभ शर्मा हे JNU च्या आवारातून वा वृत्तवाहिन्यांच्या स्टुडिओमधून मिडिया ट्रायल्सला सामोरे जात होते. या सर्व घटना घडत असतानाच गेल्या १८ दिवसांपासून 'Justice for Rohith' हे आंदोलन सुरू होते, या आंदोलनाचा भाग म्हणून सुमारे JNU चे दहा ते बारा विद्यार्थी उपोषणाला बसले होते. दि. ११ फेब्रुवारीच्या संध्याकाळी कन्हैयाने मीडिया ट्रायल्स मधून JNU च्या करण्यात आलेल्या मानहानीबाबत निंदा केली आणि देशद्रोही घोषणाबाजीच्या विरोधात त्याची आणि JNUSU ची भूमिका स्पष्ट केली. दुसऱ्या दिवशी सकाळी कन्हैयाचे भाषण व्हायरल झाले. दि. १२ फेब्रुवारीपर्यंत कन्हैया, शेहला, नागजी आणि सौरभ हे चौघे मीडियामध्ये आपापल्या भूमिका मांडत असताना ज्यांच्या कार्यक्रमात हा प्रकार घडला ते काश्मिरी विद्यार्थी कुठे गेले? दि. ९ आणि १० रोजी ओमर खालिद आणि काही काश्मिरी विद्यार्थी आपले मत मांडण्यासाठी वृत्तवाहिन्यांच्या विनंतीवरून डिबेटमध्ये सहभागी झाले, त्यावेळी अर्णब गोस्वामी, दीपक चौरसिया, सरदाना इ. यांच्या एकांगी भोकाडबाजीमुळे घोषणाबाजीबाबत आपले  मत मांडायला कश्मीरी विद्यार्थ्यांना पुरेसा वेळ मिळू शकला नाही, त्यांचे म्हणणे ऐकून न घेता फक्त भावनिक आवरण चढवून त्यांना दहशतवादी ठरवण्याचा फार्स करण्यात आला, म्हणून त्यांनी दि. ११ पासून कुठल्याही मीडियाला कुठल्याही प्रकारे सामोरे न जाण्याचा निर्णय घेतला. १२ तारखेला दिल्ली पूर्व चे भाजपा खासदार

महेश गिरी यांनी 'JNU हा दहशतवाद्यांचा अड्डा आहे' अशी FIR दाखल करत केंद्राला त्याविरुद्ध  कठोर कारवाई करण्याची विनंती केली. याआधी दोन आंदोलनांत JNUच्या विद्यार्थ्यांनी मानव संसाधन विकास मंत्रालयाला टार्गेट केले होते, १२ तारखेलाच स्मृती इराणी यांनी JNU संदर्भात जाहीर वक्तव्य केले; आणि गेल्या चार दिवसांपासून मीडिया जाणीवपूर्वक अतार्किक आणि अतांत्रिक मुद्दे पुढे करत JNUची आणि विशेषतः डाव्या विद्यार्थी संघटनांची बदनामी करत होती, त्यावरून १२ तारखेच्या संध्याकाळी JNUमध्ये पोलीस अटकसत्र राबवू शकते अशी कुणकुण AISA, SFI आणि AISFच्या कार्यकर्त्यांना लागली होती. AISF वगळता सगळे सक्रिय कौन्सिलर्स आणि कार्यकर्ते JNUमधून बाहेर पडले. काहींनी कन्हैयालाही बाहेर जाण्याचा सल्ला दिला, पण ज्यात आपली काही चूक नाही त्या लफड्यापासून दूर का पळावे  म्हणून तो कॅम्पसमधेच थांबला. १३ तारखेच्या पहाटे २ वाजता कन्हैयाला पोलिसांनी अटक केली. रात्रीच्या दोन वाजता कोणतेही 'विधि'निषेध न पाळता महिला-पुरुष होस्टेल्सची झडती घेण्यात आली. कॅम्पसमध्ये असलेल्या इतर कोणत्याही डाव्या विद्यार्थि-संघटनेच्या कार्यकर्त्याला अटक न करता फक्त कन्हैयाकुमारला अटक करण्यात आली.

**विद्यार्थ्यांचे प्रश्न**

प्रथमदर्शनी ह्या साऱ्या घटनाक्रमातून काही प्रश्न उपस्थित होतात:

- ज्यांच्या कार्यक्रमात देशविरोधी घोषणा दिल्या गेल्या, आणि ज्यांनी फूस लावून हा प्रकार घडवून आणला त्या ओमार खालिद व कंपनी आणि ABVP यांना अटक न करता कन्हैया कुमारला का अटक करण्यात आली?
- 'Country without Post Office' ह्या कार्यक्रमात Non-JNU काश्मिरी विद्यार्थी सहभागी होऊन कायदा-सुव्यवस्थेचा आणि सुरक्षेचा प्रश्न उपस्थित होईल म्हणून ABVPने कुलगुरूंकडे तक्रार केली, पण ABVPच्या गटात देखील Non-JNU चेहरे होते त्यांना कोणते लेबल लावायचे ?
- रात्रीच्या दोन वाजता देशाच्या एका प्रीमिअर इन्स्टीट्युटमध्ये सर्व

प्रोटोकॉल्स धाब्यावर बसवून एका विद्यार्थि-प्रतिनिधीला अटक करण्यात येते, विद्यापीठ यंत्रणेने यात काहीच हस्तक्षेप करू नये? (डॉ. पार्थसारथी कुलगुरु असताना आणीबाणीच्या काळातही त्यांनी पोलिसांना विद्यापीठाच्या आत येण्यास मज्जाव करून विद्यापीठात घडणाऱ्या कुठल्याही घटनेची नैतिक जबाबदारी स्वीकारण्याची भूमिका घेतली होती.) JNU च्या ४७ वर्षांच्या इतिहासात पहिल्यांदाच कॅम्पसमध्ये पोलीस येऊन विद्यार्थ्याला अटक झाली.

- राष्ट्रीय मीडियातून JNUची बदनामी होत असताना त्याविरोधात किमान स्टेटमेंट देण्याची समयसूचकता कुलगुरूंना अथवा विद्यापीठाच्या प्रशासकीय यंत्रणेला का दाखवता आली नाही ?

हे प्रश्न JNUच्या सामान्य विद्यार्थ्यांनी उपस्थित केले आहेत.

कन्हैयावर लावलेले गुन्हे न्यायालयाने अमान्य केले आहेत. कोर्टातील गुंडांनी, भाजपा आमदार व त्याच्या समर्थकांनी केलेली मारहाण, कायदा हातात घेण्याची भाषा आणि दुसरीकडे अगदी सुरुवातीपासून भारतीय संविधानावर आपला अगाध विश्वास असल्याचा कन्हैया करत असलेला दावा बघता, आणि तो ज्या पद्धतीने या सर्व कार्यवाहीला सामोरा जात आहे त्यातून त्याची आणि एकुणात JNUची प्रतिमा उजळ होत आहे.

कन्हैयाला अटक झाल्यानंतर ओमर खालिद आणि त्याच्या सहकाऱ्यांनी कॅम्पसमधून काढता पाय घेतला. ह्या घटनेचे मूळ जिथे आहे त्यावर नजर फिरवली तर कन्हैयाची अटक ही अतार्किक आहे हे सामान्य बुद्धिमत्तेचा कोणताही व्यक्ती मान्य करेल. कन्हैयाला अटक झाल्यानंतर देशाच्या गृहमंत्र्याने विधान केले की "कन्हैयाला हाफिज सईदचा पाठिंबा आहे." दोन दिवसांपूर्वी भारताच्या गुप्तहेर यंत्रणेने (IB) भारत सरकारला दिलेल्या अहवालानुसार कन्हैयाचे हाफिज सईदशी कुठलेही धागेदोरे मिळत नाहीत. ह्या अहवालासोबतच अजून एक अहवाल सरकारला सादर करण्यात आला त्यानुसार ओमर खालिदला काश्मीरमधील जैश-ए-महोम्मद या फुटीरतावादी संघटनेचा पाठिंबा आहे, तर हा दुसरा अहवाल सरकारने अमान्य केल्याची प्राथमिक माहिती समोर येत आहे. भारत सरकारने कन्हैयाच्या अटकेसाठी केलेला आततायीपणा आणि दुसरीकडे ओमर खलीदच्या बाबतीत घेत असलेला बचावात्मक पवित्रा स्पष्टपणे

सरकारच्या अथवा सरकार चालवणाऱ्यांच्या ‘motives’ला अधोरेखित करत आहे.

- ‘जैश-ए-महोम्मद’ या संघटनेचे जम्मू आणि काश्मीर राज्यातील बहुमतातील PDP ह्या पक्षाशी मैत्रीपूर्ण संबंध आहेत.
- एकीकडे राष्ट्रवादाचा नारा देत भाजपाने जम्मू आणि काश्मीरमध्ये PDP ह्या फुटीरतावादी पक्षाशी हातमिळवणी करून सत्ता स्थापन केली होती.
- जम्मू आणि काश्मीरचे मुख्यमंत्री मुफ्ती मोहम्मद यांच्या निधनानंतर राज्यात नवीन सरकार बनले नाही, आणि मेहबूबा मुफ्ती सरकार स्थापनेबाबत कोणताही ठोस संकेत देत नाहीत. त्यामुळे दिवसेंदिवस भाजपा गटातील चुळबुळ वाढत आहे.
- JNUचा विद्यार्थी ओमर खालिद (ज्याचे ‘जैश-ए-मोहम्मद’सोबत संबंध असल्याचा IBचा रिपोर्ट होता) ह्याला अटक झाली तर जम्मू आणि काश्मीरमध्ये भाजपाविरोधात जनमत तयार होऊन PDPसोबतच्या सत्तेच्या वाटाघाटी फिस्कटू शकतात.
- ओमरला अटक झाली तर आसाम आणि उत्तरप्रदेशातील मुस्लिम मतांचे ध्रुवीकरण होऊन भाजपाच्या प्रतिमेवर त्याचा नकारात्मक प्रभाव पडू शकतो, त्यामुळे सरकार ओमरच्या ऐवजी कन्हैयाला टार्गेट करून बळीचा बकरा बनवत होती. पण न्यायालयाच्या निर्णयाने सरकारच्या मनसुब्यांवर पाणी फेरले अशी चर्चा JNUमध्ये अथवा नवी दिल्लीच्या राजकीय वर्तुळात रंगत आहे.
- कन्हैयाला अटक करण्यामागे पूर्ववैमनस्याचा भाग ग्राह्य धरायचा म्हटला तर कन्हैया हा JNUमधला School of International Studies च्या African Study Centreला शिकणारा अजातशत्रू विद्यार्थी म्हणून त्याची पहिली इमेज समोर येते. ह्याच इमेजच्या आधारावर यंदाच्या JNUSUच्या निवडणुकीत AISFने फक्त एकच -- अध्यक्षपदाची -- निवडणूक लढवली आणि बहुमतांनी ती जागा निवडून आणली. कन्हैयाच्या अटकेनंतर ज्याप्रकारे भाजपाने आणि सरकारने विषय हाताळला त्याचा निषेध म्हणून ABVPच्या JNU युनिटच्या ३

पदाधिकाऱ्यांनी दिलेला राजीनामा खूप काही सांगून जातो.

- कन्हैयाला अटक करण्यामागे भाजपा गोटात JNUतील मुक्त वातावरणाबद्दल, डाव्या विद्यार्थी चळवळीबद्दल असलेला आकसही दिसून येतो. अटकेनंतर आणि कोर्टाचा निर्णय यायच्या आधी ABVP आणि भाजपा गोटातून ज्याप्रकारच्या टिप्पण्या आल्या त्यांतून त्यांचा रोख त्याच दिशेने होता.

JNUच्या निमित्ताने माझ्याही मनात उठलेला एक प्रश्न मी प्रत्येकाला विचारून त्यांची मते घेत होतो. "क्या यूनिवर्सिटी या किसी भी शैक्षणिक संस्थान में पढ़ते समय राजनीतिक मामलों मे दखल देना आपको सही लगता है?" जे.एन.यु.च्या प्रशासकीय ब्लॉकपासून पेरियार हॉस्टेलकडे पायवाटेने जाताना सोबतच्या एका विद्यार्थ्याला विचारलेला हा पहिला प्रश्न. त्यावर तो उद्गारला, "बेशक सर! शैक्षणिक जीवन में राजनीतिक घटनाओंपर सोचविचार होना, बहस होना-डिबेट होना बहुत जरुरी है; मैं यह कहूँगा की यह एक सक्रिय विद्यार्थि-जीवन का अंग है ।" मग मी त्याला प्रतिप्रश्न केला, "लेकिन राजनीति और पढाई दोनों तो अलग बातें हैं, आप इनका संबंध कैसे जोड़ सकते हैं?" यावर तो हसला आणि म्हणाला, "बहुत गहरा ताल्लुक है, अगर राजनीति कर रहे नेताओं ने जरा सी भी पढाई की होती, तो इस बार सालाना शिक्षा बजट में कटौती नहीं होती, फ़ेलोशिप बंद नहीं होती." तोच पुढे बोलू लागला, "राजनीति कहां नहीं होती? घर हो या हॉस्टल, पोलिटिक्स तो हर जगह है ना... जैसे हम अपने परिवार को एकोनोमिक्स का सबसे छोटा युनिट समझते हैं, वैसेही युनिवर्सिटी राजनीतिक मामलो का स्मॉलेस्ट युनिट समझ लीजिये." एम.ए.च्या दुसऱ्या वर्गात शिकणाऱ्या ह्या मित्राची राजकीय समज ऐकून मी एकुणात त्याच्या आजूबाजूला वावरणाऱ्या विद्यार्थ्यांच्याही बौद्धिक कुवतीचा अंदाज बांधला. पुढे सेन्ट्रल लायब्ररी समोरील मेसमध्ये School of International Relations मध्ये शिकणाऱ्या सौरभ, राशी आणि इरफान यांच्याशी रोहित वेमुलासंदर्भातील 'Justice for Rohith' या आंदोलनाच्या भविष्याबाबत चर्चा झाली. सौरभ म्हणाला की, "JNU मधली आंदोलने म्हणजे फक्त नारेबाजी नसते. Passive Resistance च्या नीतीने आंदोलने केली जातात, त्याचाच एक भाग म्हणून रोहित वेम्युला ते कन्हैया कुमार प्रकरणात अधोरेखित झालेल्या 'राष्ट्रवादा'वर

JNUमधील ज्येष्ठ प्राध्यापक, विचारवंत आणि सामाजिक कार्यकर्ते विद्यार्थ्यांचा पाठ घेणार आहेत. यात ज्येष्ठ इतिहासकार रोमिला थापर, ई.एस.अच्युतानंद, जानकी नायर, निवेदिता मेनन इ. 'राष्ट्रवाद' या विषयावर खुला पाठ घेणार आहेत. मूळची चंदिगडची असलेली राशी सांगत होती की, "JNUच्या प्रशासकीय इमारतीच्या समोर खुल्या पटांगणात ही सगळी व्याख्याने होतात, यात सर्वच विचारसरणीचे विद्यार्थी सहभागी होऊन खुल्या चर्चेद्वारे विचारमंथन करतात." School of Historical Studies मध्ये M. Phil. करणारा नील निर्दोष कुमार म्हणाला की, "मी वैयक्तिकदृष्ट्या कुठल्याही विचारसरणीला बांधील नसलो, तरी रोहित वेमुला प्रकरणाबाबत मलाही तीव्र दुःख झाले आहे, आणि JNUच्या घोषणाबाजीचे प्रकरण ज्या पद्धतीने मीडिया आणि सरकारी पातळीवर हाताळले जात आहे ते निव्वळ जनतेची दिशाभूल करणारे आहे."

गेल्या सात दिवसांत झी न्यूज, एबीपी न्यूज, आज तक, टाईम्स नाऊ इ. वृत्तवाहिन्यांनी कुठलेही सत्यशोधन न करता सरळ सरळ 'जे.एन.यू. बना आतंकियोंका अड्डा' अशी अविवेकी विधाने प्रसारित केली. हनुमानतप्पाच्या मृत्यूच्या घटनेचे जे.एन.यू. प्रकरणाला फॅब्रिकेशन करण्यात आले. सत्यशोधनाच्या ऐवजी देशभक्तीच्या परीक्षा पाहणारे असंबद्ध प्रश्न विचारून JNU ची बाजू मांडणाऱ्यांची बोलती बंद कशी राहील या अजेंडाने मिडिया डिबेट्स घडवून आणल्या गेल्या. भारतात आपण कर भरतो म्हणून आपल्याला संविधानातील मूलभूत कर्तव्यांतून मुक्ती मिळाली आहे, संपूर्ण देश फक्त आपल्याच पैशावर चालतोय आणि आमच्या पैशांवर शिकणाऱ्यांनी फक्त चुपचाप शिकून घ्यावे, आम्ही उदार मनाने आरक्षण ह्या देशात ठेवले आहे म्हणून आमच्या उपकारात राहावे अशी भावना भारतातील जवळ जवळ ६० टक्के व्यक्तींच्या मनात निर्माण झाली आहे, असे दिसते. अर्थात यात दोष त्यांच्या मानसिकता, विचारसरणी अथवा बुद्धीचा नाही तर त्यांच्या पर्यंत पोहोचवल्या गेलेल्या फॅब्रीकेटेड माहितीचा आहे. सत्य काय आहे हे सर्वांपर्यंत पोहोचावे म्हणूनच मी हा लेख लिहिला आहे. तो वाचून आपापली मते बनवायला आपण अर्थातच मोकळे आहात.

- *फेसबुक*वरून साभार

***

# प्रतिसाद

*अनुराधा मोहनी*

तलवार दाम्पत्त्य, आरुषी व हेमराज, चित्रपट

---------------------------------------------------------------------------

फेब्रुवारी महिन्याच्या 'आ सु' च्या अंकात धनंजय मुळी ह्यांचा 'तलवारच्या निमित्ताने' हा लेख वाचला. त्यामध्ये त्यांनी गतेतिहासपरिणाम ह्या संकल्पनेचे मानसशास्त्रीय विवेचन करून एका वेगळ्या दृष्टिकोनातून सिनेमाकडे पाहण्याचा प्रयत्न केला आहे. आज काही काळ गेल्यानंतर, काही गोष्टी घडून गेल्यावर आपल्याला वाटते की हेच तर आपण आधी म्हटले होते. परंतु वास्तविक तेव्हा आपल्याला तसे वाटलेले नसते. एवढेच नव्हे तर तेव्हा तसे वाटले नव्हते हे आपण आज विसरूनही गेलेलो असतो.

हे तथ्य 'तलवार' सिनेमा ज्यावर आधारित आहे त्या घटनेला लागू करून ते म्हणतात की--आरुषी व हेमराज ह्यांचे हत्याकांड घडल्यानंतर पोलिसांनी अगदीच शून्यापासून सुरुवात केली होती. म्हणून त्यांची तपासाची दिशाच चुकीची होती असे म्हणता येणार नाही. तलवार सिनेमामध्ये पोलिसांची पात्रे व्यंग्यात्मक पद्धतीने मांडून त्यांची टर उडवण्यात आली आहे याबद्दल ते सिनेमाला दोष देतात. आरुषी खटल्याची कथाही त्यांनी लेखाच्या सुरुवातीलाच नमूद केली आहे. त्याचे शेवटचे वाक्य आहे, न्यायालयाने तलवार दांपत्याला शिक्षा ठोठावली. मला वाटते त्यापुढे 'तलवार दांपत्य आजही जन्मठेपेची सजा भोगत आहे.' हे वाक्य असायला हवे होते. कारण शिक्षा ठोठावणे, ती प्रत्यक्ष भोगणे, ती अनेक वर्षे भोगत राहणे, त्यातून कोणतीही सूट न मिळणे हे वेगवेगळे टप्पे आहेत आणि त्यातून कोणत्याही टप्प्यावर सूट मिळण्याने जो काही दिलासा मिळतो, तो त्यांना मिळालेला नाही.

मुळी ह्यांनी 'तलवार'ची तुलना अकीर कुरोसावा ह्यांच्या 'राशोमान' चित्रपटाशी केली आहे. *"खटल्याच्या दोन बाजू दाखवताना अकीर कुरोसावा या प्रसिद्ध दिग्दर्शकाच्या 'राशोमान' चित्रपटाची स्टाईल दिग्दर्शक वापरतात. या स्टाईलमधे ती ती बाजू मांडताना व्यक्तिरेखांना त्या प्रसंगांमध्ये त्या त्या दृष्टिकोनातून चित्रित केले जाते. ....राशोमानमधील निरीक्षकाचा*

*नि:पक्षपातीपणा दुर्दैवाने 'तलवार' दाखवत नाही. 'तलवार'मध्ये निवेदनातील तोल तलवार दांपत्याकडे झुकला आहे... नि:पक्षपाती म्हणवून घ्यायचे आणि हलकेच एका बाजूला झुकते माप द्यायचे, ह्यामुळे चित्रपटाचा दर्जा खालावला आहे.*

परंतु ही अशी तुलना करण्याचे कारण काय? चित्रपट म्हणून ते दोघे वेगळ्याच जातकुळीचे आहेत. 'राशोमान'चा विषय एका घटनेकडे पाहण्याचे दृष्टिकोन कसे वेगवेगळे असू शकतात व त्यांना तेच कसे खरे वाटतात हे सांगण्याचा आहे, तर 'तलवार' हा एका सत्यघटनेवर आधारलेला आहे. चित्रपटाच्या सुरुवातीच्या टिप्पणीमध्ये तशी स्पष्ट नोंद आहे. सत्यघटनेवर चित्रपट वा नाटक काढणे हे एक वेगळे तंत्र आहे. अलिकडे तर त्याचा एक वेगळा प्रवर्ग बनू पाहात आहे एवढे जास्त हिंदी सिनेमे ह्या प्रकारचे आले. उदा. नीरजा भानोतच्या शौर्यगाथेवरील 'नीरजा', जेसिका लाल खून खटल्यावर आधारित 'No one killed Jessica', गुजरात दंगलीवरचा 'फिराक'. नीरजा भानोतची जी कथा आज आपल्याला माहीत आहे, ती तशीच चित्रपटात दर्शविली आहे. तेथेही ती धैर्यशील नायिकाच आहे. No one killed Jessica मध्येही प्रसारमाध्यमांनी पुढे आणलेले (म्हणजेच जनमानसात रुजलेले) तथ्य आणि चित्रपटातील आशय हे मिळतेजुळतेच आहेत. 'तलवार' चित्रपटाचे कार्य मात्र याहून अधिक कठीण आहे. "त्या आरुषी खून खटल्याचे काय झाले हो?" म्हणून कोणी विचारले, तर त्याला "तिचे नोकराशी असलेले प्रेमसंबंध तिच्या वडिलांना दिसले म्हणून त्यांनी रागाच्या भरात दोघांचा खून केला" हेच उत्तर ऐकावे लागते, म्हणजे निदान हा चित्रपट येण्यापूर्वीपर्यंत तरी ऐकावे लागत होते. त्या तेरा चौदा वर्षांच्या मुलीच्या चारित्र्याची विटंबना तिच्या अकाली मृत्यूनंतरही संपलेली नाही. आरुषीच्या ८४ वर्षांच्या आजोबांनी अलीकडेच फेसबुकवर लिहिले, "माझ्या घरात, माझ्या अंगाखांद्यावर मोठी झालेली माझी अत्यंत लाडकी नात एक दिवस सकाळी तिच्याच बिछान्यात मृतावस्थेत आढळली तेव्हा आम्हाला केवढा धक्का बसला! ह्या दुःखावर कुरघोडी करायला, तिच्यावर जिवापाड प्रेम करणारे तिचे आईवडील – माझी कन्या नूपुर व जावई राजेश ह्यांना त्या गुन्ह्याबद्दल जन्मठेपेची शिक्षा ठोठावण्यात आली..... मी हयात असेपर्यंत त्यांना ह्या कैदेतून मुक्त झालेले पाहू शकणार नाही. फक्त न्यायासाठीची लढाई पुढे सुरू राहील एवढीच आशा व अपेक्षा आहे." तलवार सिनेमा निघाल्यावर त्यांना हे लिहिण्याचे धैर्य झाले हे उघड आहे.

*खटल्यासंबंधीचा एक प्रमुख मुद्दा असा की पोलिसांच्या अगदी पहिल्या टीमकडून पुरावे गोळा करण्यात खूप जास्त त्रुटी राहून गेल्या होत्या. जर हे न्यायवैद्यकीय (forensic) पुरावे व्यवस्थित जपले गेले असते, तर तपास सोपा होऊन गेला असता (आणि हा चित्रपटही बनला नसता).*

खरे आहे. पण ते तसे झाले नाही. तलवार दांपत्याला तडकाफडकी अटक करण्यात येते आणि त्यांचा आक्रोश लोकांपर्यंत पोहोचावा म्हणून चित्रपट काढावा लागतो, हे भारतीय समाजाचे व तेथील पोलीस-न्यायव्यवस्थेचे दुर्भाग्य नव्हे काय? हा चित्रपट काढण्याची वेळ यायला नको होती असेच मलाही वाटते, पण काय करणार!

ह्या प्रकरणातील तपास जेव्हा सीबीआयकडे हस्तांतरित केला तेव्हा वेगळ्या प्रकारचे काही निष्कर्ष त्यांच्या हाती लागले. त्यानंतर तो दुसऱ्या एका टीमकडे सोपवण्यात आला. तेव्हा मात्र, तोपर्यंत सापडलेले निष्कर्ष अमान्य करून पुन्हा एकवार तलवार दांपत्याच्या विरोधात फिरविण्यात आले. आता प्रश्न असा आहे की ह्याला गत अवलोकन परिणाम कसा लागू करणार? 'तलवार' पाहताना अकीर कुरोसावाच्या दिग्दर्शनाचा प्रभाव कोणाला जाणवूही शकतो, पण तो व्यक्तिसापेक्ष आहे. ज्यांना राशोमान माहीत नाही, अशा सर्वसामान्य हिंदी प्रेक्षकांसाठी, तो एका घटनेची लपलेली बाजू प्रकाशित करण्यासाठी तयार केलेला सिनेमा आहे.

शंभर गुन्हेगार सुटले तरी चालेल, परंतु एकाही निरपराध्याला शिक्षा होता कामा नये हे ब्रीद असणाऱ्या आपल्या न्यायव्यवस्थेने पुराव्याअभावी इतरांना सोडले असताना, पुरावे नसतानाही तलवार पतिपत्नींना का दोषी ठरविले ह्या प्रश्नाचे एक उत्तर चित्रपटाने दिले आहे. उच्च व उदात्त तत्त्वे मिरवणारी आपली न्यायव्यवस्था अनेक खुज्या लोकांनी व त्यांच्या खुज्या कृतींनी पोखरलेली तर आहेच, पण त्याशिवायही ती कायदे, नियम ह्यांच्या बंधनांत अडकलेली आहे. ह्या व्यवस्थेला तथ्ये समजतात, पण सत्यापर्यंत पोहोचता येते काय? पुराव्याने शाबित करता येते, पण पीडिताला न्याय मिळवून देता येतो काय? हे खरे प्रश्न आहेत आणि हे प्रश्न पडणे हे चांगल्या कलाकारांचे लक्षण आहे. आरुषी प्रकरणातील खरा गुन्हेगार कोण हे आज अस्पष्ट असले, तरी येणारा काळ ह्याचे उत्तर देईल. आणि ते जर हेच (चित्रपटाने दिलेले) असले, तर "२०१६ साली निघालेला तलवार हा चांगल्या दर्जाचा चित्रपट होता" अशी नोंद इतिहासाला घ्यावी लागेल.

***

# आत्मशोधार्थ शिक्षण

*बालकृष्ण पिशुपती (अनुवाद : अंबुजा साळगांवकर, जयंत कीर्तने)*

शिक्षणव्यवस्था, आत्मशोध , युवकांना आवाहन

---------------------------------------------------------------------------

शिक्षण स्वतःचा शोध व समृद्धी ह्यांसाठी तसेच जनसामान्यांच्या हितासाठी कसे उपयोजित करता येईल, विद्याशाखांमधील कृत्रिम भिंती कशा तोडता येतील, शिक्षणक्षेत्रात प्रेरणा व स्वातंत्र्य ह्यांचे महत्त्व काय, अशा अनेक महत्त्वाच्या मुद्यांचा परामर्श घेत व त्याला स्वानुभव जोडत आंतरराष्ट्रीय एका युवा विख्यात शास्त्रज्ञाने मुंबई विद्यापीठाच्या दीक्षान्त समारंभात केलेल्या भाषणाचा संपादित अनुवाद.

---------------------------------------------------------------------------

तुमच्यापैकी बहुतेकांना ठाऊक असेल की दीक्षान्त संदेशाला संयुक्त राष्ट्रांमध्ये शुभारंभाचे भाषण म्हणतात. विविध विषयांतील स्नातकहो, पदवी प्राप्त करून आज तुम्ही बाहेरच्या जगात स्वत:ची ताकद आजमावण्यासाठी, स्व-गुणवत्तेच्या बळावर व्यक्ती म्हणून उत्क्रांत होण्यासाठी, जीवनात नव्या वाटेवर शुभारंभ करण्यासाठी पाऊल टाकत आहात.

मित्रहो, अभिनंदन आणि अभीष्टचिंतन!

ह्या प्रसंगी आपल्या गुरुजनांचे स्मरण ठेवा. केवळ शिक्षणातच त्यांची मदत झाली असे नाही तर आजवरच्या जीवनप्रवासात त्यांनी आपल्याला आधार दिला. त्यांच्याजवळचे ज्ञान त्यांनी आपल्याला वाटून दिले.

इथे एका संस्कृत श्लोकाची आठवण होते.

न चौरहार्यं न च राजहार्यं न भ्रातृभाज्यं न च भारकारि।

व्यये कृते वर्धत एव नित्यं विद्याधनं सर्वधनप्रधानम्॥

अर्थात, ज्ञानास न चोरून नेता येते, न राजाला ते लाटता येते, भावंडां-बरोबर वाटणी करण्याची गरज नाही आणि त्याचे ओझेही नाही. असे हे विद्याधन नेहमीच दिल्याने वाढते म्हणून सर्वप्रकारच्या धनांमध्ये विद्याधन हे श्रेष्ठधन होय.

म्हणूनच जितके जास्त शिकाल तितके अधिक तुम्ही लोकांना देऊ शकाल.

आज इथे जमलेले तुम्ही सारे भाग्यवंत आहात. भारतात स्थापन झालेले

केवळ दुसरेच असल्याने या विद्यापीठाने देशाला अनेक विद्वान आणि महनीय व्यक्ती दिल्या. विद्यापीठाचा इतिहास सांगणाऱ्या "द क्लॉइस्टर्स पेल" या चरित्रग्रंथातून व्यक्त होते की शिक्षण केवळ पदवीसाठी नव्हे तर व्यक्तिमत्त्वाला पूर्णत्व देण्यासाठी हा विचार येथे झाला. स्थापनेपासूनच या विद्यापीठाने एकमार्गी नव्हे तर बहुआयामी व्यक्तिमत्त्वे घडविली. अल्बर्ट आईन्स्टाईनने म्हटले आहे, महाविद्यालयीन शिक्षणाचे मूल्य केवळ काही तथ्य शिकण्यापुरते नाही तर ते मनाला विचार करण्याचे प्रशिक्षण देण्यासाठी आहे. तुम्ही काही सत्ये शिकलात, त्यांची परीक्षा झाली आणि इथे येण्याची परीक्षा तुम्ही पास झालात. पण एक प्रश्न स्वत:ला जरूर विचारा -- तुम्ही किती विचार करू शकता आणि स्वत:च्या नि समाजाच्या भल्यासाठी त्यापैकी किती कृतीत रूपांतरित करू शकता? मूल्याधिष्ठित आणि गुणाधिष्ठित स्पष्टतेने विचार करा.

ई बुक्सच्या जमान्यात तुमच्यापैकी कितीजणांनी लहानपणी चित्रांची नि गोष्टींची पुस्तके वाचलेली असतील याची मला शंका आहे. छोट्यांचे प्रिय मासिक चंदामामा मी माझ्या लहानपणी तेलुगुतून वाचल्याचे मला कायम स्मरत असते. जिचा माझ्या मनावर ठसा उमटला आहे अशी ही चंदामामातील एक कथा --

एका खेडेगावात अतिशय हलाखीत जगणाऱ्या एका गरीब शेतकऱ्याची. शेतकरी त्याची पत्नी आणि अंध आई यांसह दु:खात दिवस काढत असतो. त्याला नि त्याच्या पत्नीला संतती हवी असते पण संतती असणे त्यांना परवडणारे नाही.

एके दिवशी परमेश्वर त्या शेतकऱ्यासमोर प्रकटतो आणि म्हणतो एक वर माग. तो शेतकरी नि त्याचे कुटूंब गोंधळून जातात. त्यांना श्रीमंत बनायचे होते, बाळ हवे होते नि आईसाठी दृष्टीही. क्षणभर विचार करुन शेतकरी परमेश्वराकडे जाऊन म्हणतो एका वराने तो नक्की सुखी होईल. बिचाऱ्या शेतकऱ्याची हलाखी माहीत असलेल्या परमेश्वराला मजा वाटते, कसा काय बुवा हा एकाच वरात याच्या साऱ्या आशा पुऱ्या करवून घेणार.

शेतकरी परमेश्वराकडे वळून वर मागतो तो असा, "हे परमेश्वरा, माझ्या आईने माझ्या राजवाड्यातील सोन्याच्या पाळण्यात खेळणारा तिचा नातू पाहावा म्हणजे झाले". बुद्धिचातुर्यपूर्वक व्यक्त केलेल्या या एका इच्छेने प्रसन्न होऊन परमेश्वर शेतकऱ्याची इच्छा पूर्ण होईल असा वर देतो. त्यायोगे शेतकरी श्रीमंत होतो, त्याला बाळ मिळते, शेतकऱ्याच्या आईला दृष्टी मिळते.

साधारण दहा वर्षांचा असताना वाचलेल्या या गोष्टीने दिलेला संदेश होता - *यशाची केवळ अपेक्षा धरून भागत नाही, ते साध्य होण्यासाठी मिळालेल्या प्रत्येक संधीचे सोने करता येईल असे तीक्ष्ण मन तयार करायला हवे.*

अमेरिकेचे नेते अब्राहम लिंकन यांचे एक वाक्य आहे -- *युद्धासाठी तुमच्याकडे १२ तास असतील तर त्यांपैकी अकरा तास तुम्ही तुमच्या शस्त्रांना धार लावण्यासाठी वापरा.* आपल्यापैकी सर्वांना खूप गोष्टी हव्या असतात आणि आपली स्वप्ने पूर्ण करण्यासाठी आपण खूप राबतही असतो. पण आपण जर या शेतकऱ्यासारखे संधी पकडण्यासाठी तयार नसू तर आपल्या आकांक्षांची यादी लांबत जाईल, परंतु स्वप्नांची पूर्तता होणार नाही.

शिक्षण तुम्हाला तुमच्या स्वप्नांच्या पूर्ततेसाठी लागणारी साधने आणि आवश्यक अशा संधी उपलब्ध करून देते. पण हे शिक्षण म्हणजे तरी काय?

तुम्ही लोकांना हा प्रश्न विचारला तर बहुतेकदा तुम्हाला तेच ते लोकप्रिय उत्तर मिळेल, आधी पदवी आणि त्यायोगे एक आकर्षकशी नोकरी मिळविण्यास करण्याचा अभ्यास. गेल्या काही दशकांत, विशेषत: भारतात शिक्षणाची संकल्पना आणि मूल्ये पूर्णत: बदलून गेली आहेत ही नोंद घेण्याची बाब आहे. .

आपल्याकडे शिक्षणक्षेत्रात कार्यकर्त्यांपेक्षा व्यावसायिकांची संख्या जास्त आहे; शिकविणारे जास्त आहेत, प्रेरित करणारे मोजकेच. आज आपल्याकडे पूर्वीपेक्षा अधिक महाविद्यालये नि विद्यापीठे आहेत. स्थूलमानाने पाहता प्राथमिक शिक्षणापर्यंत पोहोचण्याच्या संधी वाढविण्याचे उद्दिष्ट आपण साधले आहे. शिक्षणामध्ये लैंगिक समतोलाची खात्री देणारे चांगले धोरण आपल्याकडे आहे. शिक्षण हा मानव-अधिकार मानला गेलाय. हे सारेच प्रतिभेचे द्योतक आहे आणि या परिवर्तनाचा भाग असलेल्या प्रत्येकाचे आपण अभिनंदन केलेच पाहिजे.

थोडे थांबूया. पदवीधरांच्या नि नोकरदारांच्या वाढलेल्या संख्येबद्दल का आपण हे बोलत आहोत? की आपण खऱ्या अर्थाने शिक्षित लोक वाढले असे म्हणत आहोत? संभ्रम आहे ना? गेल्या काही दशकांत नेमके काय बदलले आहे ते मी खालील दोन मुद्यांच्या आधारे स्पष्ट करणार आहे.

**स्फूर्ती ही दर्जेदार शिक्षणाची गरज आहे**

आज युवामनाला प्रेरित करणे हे आपले लक्ष्य असल्याचे दिसत नाही. प्रसिद्ध इतिहासकार हेन्री ॲडमनी म्हटले आहे, "शिक्षक हा कालातीत परिणाम

साधत असतो. त्याच्या प्रभावाची सीमा कुठवर हे तो कधीच सांगू शकणार नाही". विद्यार्थ्यांच्या उर्मी जागविणाऱ्या शिक्षकांचे समूह ही शिक्षणजगतातील सर्वांत मोठी घटना असेल. हे माझे विधान केवळ शाळा-महाविद्यालयांतील विद्यार्थी आणि शिक्षकांपुरते मर्यादित नाही तर शिक्षणाची आस असणाऱ्या समाजातील प्रत्येकाला अनुलक्षून आहे."

विद्यार्थ्यांकडे शिक्षकांकडून प्रेरणा अनेक मार्गांने येईल. मग त्यामध्ये ज्ञानाचा व्यासंग, सामाजिक भान, व्याख्यानकौशल्य, लोक जोडण्याची कला, करुणा, शिक्षकाचे होतकरूपण वा खडतर कष्टांसाठी असलेली तयारी असे कितीतरी. एका चांगल्या शिक्षकामध्ये यांपैकी किमान एक तरी गुण असला पाहिजे. त्याहून महत्त्वाचे म्हणजे चांगल्या शिक्षकाला विद्यार्थ्यांशी जोडून घेत, त्यांची मने जिंकून आपले हे गुण त्यांच्यात उतरवता आले पाहिजे.

स्टीफन हॉपसन एक यशस्वी भागदलाल आणि प्रेरक लेखनासाठी प्रसिद्ध अशी व्यक्ती. कर्णबधिर असलेल्या स्टीफनना सामान्य मुलांच्या शाळेत घातले होते. त्या नियमित वर्गाशी जुळवून घेण्यात त्यांना खूप अडचणी येत. विशेषत: सहाध्यायीं त्यांची टर उडवत असल्याने त्यांचा आत्मसन्मान सदाचाच खालावलेला. एके दिवशी तेथील एका विद्यार्थिप्रिय शिक्षिकेने वर्गाला एक प्रश्न विचारला. शिक्षिकेच्या ओठांच्या हालचाली काळजीपूर्वक वाचल्याने स्टीफनना तो प्रश्न कळाला आणि त्याचे उत्तर त्यांनी स्वयंस्फूर्त दिले. तोपर्यंत इतरांना त्या प्रश्नाचा अजून नीट बोधही झालेला नव्हता. आश्चर्यचकित शिक्षिकेने जोसात म्हटले, "अगदी बरोब्बर, स्टीफन!" ते तीन शब्द आणि त्या शिक्षिकेचे ते उच्चारण यांतून लहानग्या स्टीफनच्या मनात पुष्कळ आत्मविश्वास रुजला. पुढे हा स्टीफन यशवंत होऊन अनेकांना प्रेरित करता झाला.

माझे अनेक प्रेरणास्रोत आहेत. माध्यमिक शाळेत शंकरराव नावाचे माझे जीवशास्त्राचे शिक्षक होते. ते मोठे चित्रकार. तासाभरातील पंचेचाळीस मिनिटे ते केवळ एका फुलाचा वा खोडाचा छेद काढण्यात घालवीत. तशी त्यांची शिकवण्याची क्षमता जुजबी होती पण त्यांच्या चित्रकारीतील केवळ रंग आणि आकृतिबंधांनी मला जीवशास्त्राची इतकी गोडी लावली की मी पदवीसाठी जीवशास्त्र हा मुख्य विषय ठेवला. माझे दुसरे प्रेरणास्थान माझे आणखी एक शिक्षक डॉ. रामन ज्यांची शास्त्रीय संशोधनपर निबंध अत्यंत अचूक शब्दांत

मांडून कठीण संकल्पनांचे गोष्टीरूपाने निरूपणाची हातोटी मी आत्मसात केली. सर्वस्वी विखुरलेल्या अनेक गोष्टींच्या बांधणीतून एखाद्या बिंदूपर्यंत पोहोचण्याचे डॉ.स्वामिनाथन यांचे कौशल्य आजही मला निःस्तब्ध करून सोडते.

शिक्षकांनीच विद्यार्थ्यांना प्रेरित करायचे असेच नाही काही. उलटही घडू शकते. मी इंग्लंडमधील केंब्रिज विद्यापीठामध्ये शिकत असतांना शंकानिरसनार्थ एका ज्येष्ठ प्राध्यापकांच्या भेटीसाठी धडपडत होतो. प्राध्यापक महोदयानी ते काही दिवस जर्मनीच्या प्रवासात असल्याने नंतर भेटूया असे म्हटले. ते एखाद्या परिषदेसाठी चाललेत का असे मी कुतूहलापोटी विचारले तर उत्तरात त्यांनी ते जर्मनीतील हायडलबर्ग विद्यापीठात एका विद्यार्थ्याच्या भेटीस निघाले असल्याचे सांगितले. मला वाटले, नक्कीच मौखिक-परीक्षेसाठी असणार. तितक्यात, मस्त कल्पनांचा स्वामी असलेल्या त्यांच्या आढळातील एका हुशार विद्यार्थ्याशी बोलून त्याला आपल्या केंब्रिज येथील चमूमध्ये निमंत्रित करण्यास तेथे चाललो आहे असे ऐकवून त्यांनी मला थक्क केले.

एक प्राध्यापक एका विद्यार्थ्याच्या भेटीस जाऊन त्याला आपल्या संशोधकमंडळात येण्यास विनंती करतो हे भारतातून आलेल्या माझ्यासाठी कल्पनातीतच! पुढील दहा वर्षांत या गुरु-शिष्य जोडगोळीने २००९ चे वैद्यकशास्त्राचे नोबेल पारितोषिक जिंकले.

आपल्याला भारतामध्ये अशा प्रकारचे शिक्षक-विद्यार्थी संबंध हवेत. ते नाते आदर आणि विश्वासात भिजलेले असावे, ज्ञानाच्या शोधार्थ असावे, केवळ श्रेणीने आणि गुणांनी मापलेले ते नसावे. शिक्षणाच्या प्रांतात स्वातंत्र्य या विषयाला वेशभूषा आणि मूल्यमापनाच्या उत्तम पद्धती याहून खूप अधिक अर्थ आहे. आपल्याला प्रेरक बनायचे आहे, प्रेरितही असायचे आहे.

**ज्ञान विद्याशाखानिहाय नसते**

पदवीपुरते ज्ञान हा जीवनविद्येपेक्षा वेगळा विषय. विद्यार्थ्यांस त्यांच्या रोजच्या शैक्षणिक-विश्वापार काही गोष्टी वाचून समजून घेण्यास उद्युक्त करणे हे आधुनिक शिक्षणासमोरचे एक मोठे आह्वान आहे. शिक्षण हे निव्वळ पाठ्यक्रमावर बेतलेले नको, ते व्यक्तीच्या रुचीनुरूप होणे आवश्यक आहे. पाठ्यक्रमात तडजोड करावी असे नव्हे पण तेथे लवचिकता जरूर हवी.

आर्यभट्ट, वराहमिहिर, व्यास, पतंजली, चार्ल्स डार्विन, ॲडम स्मिथ,

नोआम चोम्स्की, रॉजर पेनरोज, एडवर्ड विल्सन यांसह अशा डझनावारी यशस्वी शास्त्रज्ञांची आणि तत्त्ववेत्यांची उदाहरणे मी देईन की ज्यांनी आपले औपचारिक शिक्षण एका विज्ञानविद्याशाखेमध्ये घेतले पण त्यांचे जगाला नव्या वाटांवर नेणारे संशोधन दुसऱ्याच एखाद्या क्षेत्रात घडले. कारण या सर्वांनीच शिक्षण-परीक्षा-व्यवसाय अशा साखळी पलीकडे स्वत:ची आवड जपली आणि उपलब्ध संधींचा उत्तम तऱ्हेने उपयोग करून घेतला.

भारतीय विद्यापीठांच्या प्रांतिक आणि जागतिक स्तरावरील दर्जांकाबद्दल आणि आमच्या विद्यापीठांनी जगातील सर्वोत्तमांच्या स्पर्धेत टिकण्यासाठी काय करावे याविषयी व्याकुळ होत सादर केलेल्या बऱ्याचशा टीका आपण नेहमीच वाचतो. आपल्याला स्पर्धेत उतरायचे नि जिंकायचे असेल तर अध्यापन, संशोधन आणि विद्यार्थ्यांचे संगोपन या तीनही मध्ये क्रांतीची गरज आहे.

केवळ शाखाबाह्य नि आंतरशाखीय अध्यापन-संशोधनाच्या संधींनी काम भागणार नाही. आपल्याला मुळात हे पटायला हवे की केवळ विद्यार्थ्यांना नवे संशोधन-प्रकल्प देऊन हे साधणार नाही तर त्यासाठी आपल्या विद्यार्थ्यांना नि शिक्षकांनाही प्रशिक्षण आणि नवे वळण द्यायला हवे. विद्यार्थ्यांनी पदवीपूर्व शिक्षणात कला, शास्त्र वा वाणिज्य यांपैकी एक आणि एकच शाखा निवडावी अशी सक्ती करणारे बुरूज (ज्यांतून आत-बाहेर करणे सोपे नसल्याने विद्यार्थ्यांचे संपूर्ण व्यावसायिक भवितव्य एकदाच पक्के होते), आपल्याला तोडायला हवेत. उत्क्रांती आणि परिस्थितिकी हे विषय सामाजिक आणि मानसशास्त्राच्या अध्यापनात आले पाहिजेत, वनस्पती आणि प्राण्यांच्या वर्तनाच्या अभ्यासातून वास्तुशास्त्राच्या शिक्षक आणि विद्यार्थ्यांना स्फूर्ती मिळायला हवी. फुलांचे सडे नि बियांच्या विखुरण्यांतून विमान-अभियंत्यास प्रेरणा मिळावी. पारंपरिक ज्ञानाला वैद्यकशास्त्रांत स्थान हवे, समाजशास्त्र हे विज्ञानाच्या पाठ्यक्रमाचा भाग व्हावे, हे आणिकही असेच.

आज तुमच्यासाठी या सगळ्याचा अर्थ काय ते आता मला सांगू दे.

जगाच्या वास्तविकतेशी सामना करण्यासाठी तुम्ही बाहेर पोहोचत आहात. काही महिन्यांत तुम्हाला तुमचे जीवनध्येय निश्चित करायचे आहे, जीवनात स्थिर व्हायचे आहे आणि आजवरच्या तुलनेत मोठ्या जबाबदाऱ्या स्वीकारायच्या आहेत. याची तयारी कशी करायची ते वर्गाच्या चार भिंतींमध्ये नव्हते शिकवले.

निरीक्षणे, प्रयोगबुद्धी, आकांक्षांचे मूल्यमापन आणि भवितव्याची बहुपर्यायी आखणी यांतून बरेचसे शिकणे होत असते.

कधी कधी आपल्यापैकी पुष्कळजण इच्छिलेले सारे मिळण्याइतके नशीबवान नसतात. परंतु आपल्याला आपल्या योग्यतेनुसार मिळावे यासाठी आपण प्रयत्न नेहमीच करू शकतो. आता तुमच्या योग्यतेचे काय हे तुम्हाला कसे कळणार? तुम्ही जे उत्तम तऱ्हेने करता त्याच्याशी तुमच्यायोग्य काय ते थेट संबंधित असते. काय नि कसे कराल त्यांबद्दल तुम्हाला आंतरिक आस आणि अभिमान वाटेल तर त्या कृती उत्तमच होतील.

आज टाळ्यांच्या गजरानंतर तुम्ही तुमच्या आयुष्याच्या मार्गांवर निघण्यापूर्वी, तुम्ही कराव्यातशा चार गोष्टी मी उद्धृत करणार आहे.

**तुमच्या आवडींशी तडजोड करू नका. तुम्हाला आवडेल तेच करता येईल असे मार्ग शोधा**

मी सहा वर्षांचा होतो तेव्हा माझे वडील गेले. आर्थिक गरजांसमोर टिकाव धरणे हे कुटुंबासमोरचे मोठे आव्हान होते. माझे शालेय शिक्षण कधीतरी पूर्ण होईल असे वाटले नव्हते. लवकरच मला वृत्तपत्रकारितेत रस निर्माण झाला आणि मी खूप वाचायला लागलो. बहुतेकदा आमच्या घराजवळच्या ग्रंथालयातून मी पुस्तके आणत असे. दृष्टी अधू असलेले माझे चुलते मला मदत करीत. दररोज मी त्यांना "द हिंदु" हे वृत्तपत्र वाचून दाखवीत असे. सुरुवातीस माझे ते काम यांत्रिक वाचकासारखे, म्हणजे मजकूर फारसा न समजताच चालले. काका नेहमी एकच सांगायचे, एकदा वाचून समजले नाही म्हणून चिंता करू नको. वाचत राहा आणि तुला ते समजायला लागेल. यातून माझे वाचन, आकलन आणि लेखन ह्यांचा पाया भरला गेला.

अशीच शाळेच्या दिवसांत मला विज्ञानाची खास गोडी लागली आणि एक दिवस माझ्यावर बेतली. माझ्या शिक्षकांनी उठवून मला मी माझे नाव बालकृष्ण पी. एमएससी. असे लिहिण्याबद्दल जाब विचारला होता. मी निरागसपणे म्हणालो, मी विज्ञानमंडळाचा सदस्य आहे (Member of Science Club). पदव्युत्तर पदवी कशाशी खातात वा ते संक्षिप्तरूप नेमके कसे लिहितात यांपैकी काहीही माहीत असण्याचे ते वय नव्हते.

पदवीधर होताहोताच मला भारतीय रेल्वेत वरिष्ठ कारकुनाची नोकरी

मिळाली. कुटुंबातील प्रत्येकालाच यामुळे प्रचंड आनंद झाला, मला मात्र नाही. मला माझे पदव्युत्तर शिक्षण पूर्ण करायचे होते. म्हणून मी रेल्वेच्या मानव संसाधन अधिकाऱ्याकडे गेलो आणि एमएससी पूर्ण करण्याचे कारण देऊन दोन वर्षांनी रुजू होण्यासाठी परवानगी मागितली. त्या दयाळू गृहस्थांनी मला तेवढा वेळ दिला. मी एमएससी पूर्ण केले आणि परीक्षा संपल्याच्या दोनच दिवसांत नोकरीवर रुजू झालो.

माझ्या आर्थिक गरजांची काळजी घेण्यास ही नोकरी पुरेशी असली तरी तिथून निघण्याची हरेक संधी मी शोधत होतो. कारण कारकुनीमध्ये मला एक दिवसही आनंद नव्हता. एके दिवशी लंडनमधील केंब्रिज विद्यापीठात संशोधन शिष्यवृत्तीसाठी अर्ज करण्याची संधी मला मिळाली, अशी संधी जी मला त्या नोकरीतून मुक्ती देईल. प्रवेशप्रक्रिया पूर्ण होऊन शिष्यवृत्ती मिळेपर्यंत दीड-एक वर्षाचा कालावधी गेला. तेवढ्या वेळात संशोधनासाठी तयारी करायची आहे अशा सबबीवर मी रेल्वेमधील नोकरी सोडून चेन्नई येथील कीटविज्ञानी अनुसंधान केंद्रामध्ये (Entomology Research Institute) सहाय्यक संशोधक म्हणून रुजू झालो होतो. खरे तर एका पदव्युत्तर पदवीधराच्या मानाने खूपच खालचे पद, पण तत्काळ उपलब्ध असलेली ती एकच जागा होती...

एका वर्षाच्या आत तीन आंतरराष्ट्रीय दर्जाच्या संशोधनपत्रिकांमधून माझे पाच संशोधननिबंध प्रसिद्ध झाले होते.

केंब्रिजमध्ये शिकायला जाणे हे जीवनाला कलाटणी देणारे होते. केवळ संशोधनासाठी नव्हे तर जीवनविषयक एक वेगळा दृष्टिकोन या अनुभवाने दिला. तेथे नोबेल पुरस्काराच्या मानकऱ्यांबरोबर वा स्टीफन हॉकिंग्ज यांच्याबरोबर गप्पा ही नेहमीच, अगदी कॉफी टेबलवर घडणारी गोष्ट असे. माझ्यात पूर्वी अगदीच नगण्य असलेले जनमानसात वावरण्याचे कौशल्य विकसित करण्याचा विश्वास अशा संभाषणांनी मला दिला.

एक चांगला संशोधनप्रकल्प आणि शेल बायोटेक्नॉलॉजी कंपनीतील जागा यांसह माझे संशोधन उत्तम चालले होते. १९९०च्या नाताळच्या सुट्टीत चेन्नईमध्ये असताना माझी डॉ. स्वामिनाथन यांच्याशी एक अनौपचारिक भेट झाली. तेथेच त्यांच्या नव्या संशोधनसंस्थेत सामील होण्याचे निमंत्रण मिळाले. त्यांनी मला देऊ केलेली एक गोष्ट म्हणजे संस्थेच्या जैवविविधता आणि जैवतंत्रज्ञान या

विषयांवरील संशोधनकार्यास आकार देण्यासाठीचे पूर्ण स्वातंत्र्य आणि सहकार्य.

पुन्हा एकदा मला एक कठीण निर्णय घ्यायचा होता. केंब्रिजमध्ये पीएचडी पूर्ण करायची की भारतात येऊन नव्या, उभरण्यास उत्सुक अशा एका अशासकीय संस्थेत सामील व्हायचे? मी विचार केला, केंब्रिजमधून पीएचडी करणे कौतुकाचे आहेच पण तिथल्या शेकडो पदवीधरांपैकी मी एक होणार. काही नवे स्थापन करण्याची कौशल्ये विकसित करण्यास वाव तसेच नव्या संस्थेच्या उभारणीत सहभागी होण्याची अनोखी संधी पुन्हा कुठे? थोडक्यात, मी चेन्नईमध्ये येऊन संस्थेस मिळालो.

तो निर्णय कधीच चूक ठरला नाही. केवळ २६ वर्षांचा असताना मला भारतामध्ये एक संस्था उभारून तेथे सर्वंकष अशी संशोधनसुविधा निर्मिण्याच्या प्रक्रियेबद्दल प्रचंड शिकायला मिळाले. भारत सरकारच्या जैवतंत्रज्ञान विभागाने राष्ट्रीय जैवतंत्रज्ञान कार्यक्रमाला आकार देण्यासाठीच्या कार्यदलात सदस्य म्हणून मला निमंत्रिले तेव्हा मी फक्त २७ वर्षांचा होतो. तेथला प्रत्येक सदस्य वयाने ज्येष्ठ अशा प्रथितयश व्यावसायिक सदस्यांचे सरासरी वय साठीच्यावर असलेल्या त्या कार्यदलाच्या पहिल्या सभेसाठी खोलीमध्ये शिरतानाचे माझे अवघडलेपण अजुनही मनात घोळतेय.

हळूहळू मी विविधप्रकारच्या महत्त्वाच्या जबाबदाऱ्या घेत गेलो. त्यामुळे मला नेहमी हवीशी असणारी गंभीर आह्वाने आणि निर्णयात्मक पेचप्रसंग मिळवण्यात मदत झाली. अनेक आंतरराष्ट्रीय अशासकीय संस्था, संयुक्त राष्ट्रसंघ, भारत सरकार तसेच एका आंतरराष्ट्रीय विचारमंचाकडून चालून आलेली पदे हे त्याचे फलित होय. आज संयुक्त राष्ट्र पर्यावरण कार्यक्रमातील पर्यावरण-कायदा विभागाचे नेतृत्व करणाऱ्यांमध्ये कायदेपंडित नसलेला मी एकमेव आहे.

कोणत्याही पदावर कार्यरत असताना कामाचे स्वरूप आणि मानधन यांच्यापलीकडे मनाला रुचेल ती कृती आणि स्वत:च्या क्षमतांनुसार उत्तम योगदानाची हमी या माझ्या तत्त्वांशी मी कधीच तडजोड केली नाही.

**जोखीम टाळू नका**

इथे मी असा धडा शिकलो की तुम्हाला तुमच्या स्वप्नांचा आणि आवडीच्या विषयांचा पाठपुरावा करायचा असेल तर थोडी जोखीम पत्करण्याची तुमची तयारी लागेलच. प्रयोग करायचे, एखादे घबाड हाती लागायचे तर ते

जोखिमीशिवाय होणे नाही. मनातले बोलायचे असो वा नेहमीच्या उबदार वातावरणातून दूर होण्याशिवाय पर्याय नसलेला निर्णय असो, तुम्हाला जाणीवपूर्वक जोखीम स्वीकारणे क्रमप्राप्त असते. एक लक्षात ठेवा, तुमच्या सगळ्याच योजना यशस्वी होतील असे नाही. पण मनात होते ते घडवण्याचा प्रयत्नही करायचे राहून गेले असा विषाद तरी तुम्हाला कधीच नसेल.

तुम्ही यशाच्या विचाराने गेलात म्हणजे झाले असे नव्हे. यश संपादण्यास काय करावे हे तुम्हाला माहीत हवे, यशाप्रत पोहोचण्यात संयम हवा. तुम्हाला तुमची ध्येये निश्चित करायची आहेत आणि जोखीम-व्यवस्थापनाचा अवलंब करीत त्या ध्येयांच्या दिशेत मार्ग आक्रमायचा आहे.

खरी यशस्वी माणसे अनुभवी आणि जोखिमीला सरावलेली असतात. खरे तर, यशस्वी माणसे जोखिमीच्या मर्यादा स्पष्ट झाल्यानंतरच कोणत्याही संधीच्या मागे जातात असे म्हणणे अधिक योग्य होईल. भारत आत्मनिर्भर होण्याची तयारी करत असण्याच्या काळात डॉ अब्दुल कलाम यांच्यासारख्या शास्त्रज्ञांनी स्वीकारलेली जोखीम आणि त्यातून भारताने संपादिलेले अणू आणि अवकाश कार्यक्रमांतील यश ही याची उदाहरणे होत.

तुम्ही तुमच्या भवितव्याबद्दल चाचपडत आहात. या काळात कसली जोखीम घेणार नि तिचे व्यवस्थापन करणार?

तुमच्या सहकाऱ्यांच्या तुलनेत उजवे असे जीवनध्येय ठरवा. तुम्ही वास्तुविशारद असाल तर निसर्गाची नक्कल करून अनोख्या आकृतिबंधांचे निर्माण, उत्पादन करा. तुम्ही साहित्याचे विद्यार्थी असाल तर साहित्य आणि संस्कृतीची उत्क्रांती समजून घेण्यासाठी मानसशास्त्रीय दृष्टिकोनातून प्रयोग करा. अर्थशास्त्राचा अभ्यास करणार असाल तर पर्यावरणपूरक गुंतवणुकीसंदर्भात जोखिमदारांना सल्ला देता येईल असा तुमचे वेगळेपण जपणारा पर्याय निवडा.

या आगळ्या वाटांवर स्पर्धा कमी असल्याने तुमच्यापैकी अनेकांना तेथे चमकदार व्यावसायिक यश प्राप्त करता येईल. त्यातून तुम्हाला आजवर आमच्या शिक्षणपद्धतीतील शैली आणि बंधांनी नाकारलेली अनेक विषयांमध्ये पारंगत होण्याची संधी मिळेल. हे करताना तुम्हाला काही प्रमाणात जोखीम घ्यावी लागेल पण चिकाटी आणि संयमाच्या जोरावर तुम्ही जिंकाल. वेगळे बनण्यासाठी जोखीम जरूर घ्या, तटस्थता नको.

**निष्ठेला वेठीस धरू नका**

निष्ठा ही तुमच्या यशाचा पाया आहे. बरेचदा लोक निष्ठेचा अर्थ लवचीक नसलेली असा घेतात. तसे नाही. निष्ठा हे स्वत:पुरते मूल्य नसून इतर मूल्यांची खात्री देणारे मूल्य आहे.

माणसे तीन प्रकारची असतात. अयशस्वी, अर्धयशस्वी आणि यशवंत. यांमधील फरक त्यांच्या व्यक्तिमत्त्वांतून प्रतीत होतो. निष्ठावंत असणे म्हणजे केवळ योग्य गोष्टी करत राहणे इतकेच नव्हे तर गोष्टी योग्य आहेत म्हणून त्या आवर्जून करत राहणे होय.

यशवंत राहण्यासाठी आपल्याकडे सचोटी, आत्मविश्वास आणि धीर हवा. परिस्थितिवशातसुद्धा तुम्ही निष्ठांशी तडजोड करू नये. निष्ठा ही मनाची अवस्था असते ती परिस्थितिवश नसते. छोट्याशा प्रसंगात, किरकोळ परिणाम साधण्याकरिता एकदा का तुम्ही निष्ठेशी तडजोड केलीत तर तशी सवय जडते. दुर्दैवाने आज आपल्याला सर्वत्र अशी तडजोड करणारेच दिसतात.

प्रामाणिकता ही तुमची दुसऱ्यांवरची उपचारपद्धती नसून ती तुम्ही स्वत:वर उपयोजण्याची रीत आहे. प्रामाणिकतेखेरीज निष्ठेला अधिष्ठान नाही. प्रामाणिकता आणि निष्ठा मिळून विश्वास बनतो. स्वत:वरचा आणि आपल्या भोवतीच्यांवरचा विश्वास. विश्वासातून आत्मविश्वास निर्माण होतो ज्याची आपल्याला जीवनातील अनेक समस्यांवर मात करताना अगदीच गरज आहे, जो आपल्याला जीवनध्येये साध्य करण्यासाठी जोखीम स्वीकारण्यास प्रोत्साहित करतो.

अलिकडेच मला राष्ट्रीय जैवविविधता प्राधिकरणाचा अध्यक्ष या नात्याने जैवविविधता कायद्याच्या भारतामधील अंमलबजावणीसंबंधी एक निर्णय घ्यायचा होता तेव्हा असे जाणवले की संस्था आणि कायदा या दोहोंच्या हिताविरुद्ध निर्णय घेण्यास भाग पाडण्यासाठी माझ्यावर आस्थापनेचा दबाव येतो आहे. निर्णय टाळण्यासाठी मी प्रयत्नांची पराकाष्ठा केली. मी संस्थेचा कार्यकारी प्रमुख. तत्त्वांशी तडजोड करावी लागण्याचा बाका प्रसंग आला तेव्हा ते पद सोडले, निष्ठा जपली. याचे काही व्यक्तिगत परिणाम अटळ होते तरी सत्य आणि संस्थेचा विश्वास यांच्याशी एकनिष्ठ राहिलो म्हणून जीवनात पश्चात्ताप कधीच झाला नाही.

एक गोष्ट येथे लक्षात ठेवा, आजकालच्या समाजामध्ये तडजोडीचे फायदे

जीवनाचाच भाग असल्यासारखे दिसत असता निष्ठा अभंग ठेवणे मुश्किल आहे. पण मी आधी सांगितले ते विसरू नका, तुम्ही वेगळे असाल तर (निष्ठेसाठी) उभे ठाकाल आणि जिंकाल.

**केवळ एक प्रथितयश व्यावसायिक बनण्याचे नियोजन नको, एक चांगली व्यक्ती बनण्यासाठी नियोजन करा.**

यशाच्या मार्गावर एक चांगला माणूस कसे बनावे हे कुणी आपल्या शाळा-महाविद्यालयात शिकवत नाही. प्रथितयश व्यावसायिक कसे बनावे आणि ते यश कसे टिकवावे याचे शिक्षण-प्रशिक्षण देणारे अभ्यासक्रम, उद्बोधनशाळा, व्याख्याने आणि वर्ग कदाचित जरा जास्तच चालताहेत. परंतु व्यावसायिक बनण्यासाठी आधी चांगला माणूस असणे गरजेचे आहे असे सांगणारा एकही अभ्यासक्रम आढळात नाही.

लोक जोडण्याचे कौशल्य, प्रेरकता, नेतृत्वाची आवड, यशाची आस आणि सतत शिखरावर राहण्याचा लोभ हे सारे आपल्या दैनंदिन विचारधारा नि कृतींचे उर्जास्त्रोत असतात. आपल्याला सतत वाटत असते की यांना साध्य करण्यासाठी आपल्याला छान, हुशार आणि तैलबुद्धी असायला हवे. परंतु अस्सल, प्रेमळ आणि जबाबदार मनुष्य व्हावेसे आपल्याला कधीतरीच वाटतं.

ॲपलचे जनक स्टीव्ह जॉब्स यांना ॲपलमधून डच्चू मिळाल्यावर स्वतःच्या मनोवस्थेचे वर्णन करताना म्हणतात, "पुन्हा नवोदित बनण्याच्या कल्पनेतील हलकेफुलकेपणाने माझ्यावरचा यशाचा भार हरला".

आपल्यापैकी पुष्कळांना वाटत असते व्यावसायिक यश मिळवण्यासाठी आधी आपण आपल्या सहकाऱ्यांशी स्पर्धा करून स्वतःला सिद्ध केले पाहिजे. सत्ता आणि अधिकार आपल्या मनात अशी भावना निर्माण करतात की आता आपल्याला एकट्यालाच बरोबर वाटलेले निर्णयसुद्धा आपण घेऊ शकतो. सत्ता आणि अधिकार हे दोन्ही क्षणभंगुर आहेत हे आपण विसरतो. आपल्या हातातून हे दोन्ही जातात त्या क्षणाला जणु तुमचे विश्व तुमच्या डोळ्यांसमोर कोसळते. तुमच्यावर स्तुति-कौतुकांचा वर्षाव करणारे तेच ते लोक तुम्हाला टाळायला लागतात, तुमच्याकडे दुर्लक्ष करतात.

जीवन सीमित आहे. उद्याच मरणार असल्यासारखे आज जगून घ्या. दुसऱ्याच कुणाच्यातरी गरजांप्रमाणे वा जगण्याप्रमाणे जगून ते वाया घालवू

नका. तुमचा अंतर्नाद तुम्हाला मार्गदर्शन करो, इतरांच्या मतांच्या गोंगाटापासून तुमची सुटका करो.

मित्रहो, हा क्षण तुमच्या जीवनातील एकमेवाद्वितीय असा आहे, पुन्हा तो तसा लाभणार नाही. आज तुमच्याकडे गमवण्यासारखे काही नाहीच. मौल्यवान असे जे जे तुम्ही मिळवले आहे ते तुमच्या स्वत:मध्ये सुरक्षित आहे. तुमच्याकडे स्वप्न असेल तर त्याच्या पूर्ततेसाठी निघण्याची हीच वेळ आहे. तुम्ही खूप भाग्यवंत आहात, तुम्हाला स्वत:ची ओळख आहे. तुमच्या साहाय्याला तुमचे पालक, कुटुंब आणि मित्र आहेत. नशीबवान आहात की तुम्ही अमेरिकेत जन्मला नाहीत, अन्यथा एव्हाना शिक्षणकर्जाचे डोंगर तुमच्या शिरावर असले असते. तुम्ही सुदैवी आहात की संधींची भूमी म्हणून आज भारताचे नवनिर्माण होत आहे. तुमच्यापैकी पुष्कळांना मोठ्या जबाबदाऱ्या नसण्याचे वरदान आहे.

ही वेळ तुमच्यापैकी प्रत्येकाने विचार करण्याची आहे की दुर्दैवी, कमनशिबी असे जे मर्यादित संधींसह आशेच्या अंधुक किरणांत चाचपडताहेत त्यांच्या जीवनात इष्टपरिवर्तन आणण्यास आपण कसे कारण होऊ. उठून बसावे नि जग पाहावे इतकीही ताकद नाही त्यांच्याकडे जेव्हा तुम्ही उठून जीवनाचा डाव मांडायला सिद्ध आहात.

तुमच्यापैकी प्रत्येकजण जीवनभरामध्ये आपल्या नातेवाईकांव्यतिरिक्त किमान पाच देशवासीयांच्या जीवनांत इष्टपरिवर्तन आणण्याची शपथ घ्याल का? हे आह्वान स्वीकारलेत तर आत्ता, या क्षणाला, या देशातील हजारो वंचितांना तुम्ही जीवेच्छा दिलेली असेल. कल्पना करा, पुढील दहा वर्षांतील या विद्यापीठाच्या पदवी आणि पदव्युत्तर सर्व स्नातकांनी असा पुढाकार घेतला तर...
तीन मंत्र देऊन थांबतो –

शिकत राहा, प्रथितयश व्यावसायिकाच्या पुढे जाऊन एक उत्तम व्यक्ती म्हणून मोठे व्हा आणि जे शिकलात ते देण्यातला आनंद लुटा.

स्वप्नांचा पाठपुरावा करा, स्वत:चेच जीवन जगा. आणि

विसरू नका, दानात अभिवृद्धी आहे -- जितके द्याल तितके भरभरून तुम्हाला मिळणार.

तुम्हा सर्वांना माझ्या शुभेच्छा!

***

अनुभव

# 'बोल्ड' हे 'ब्युटिफूल'च हवे

*सुरेश सावंत*

---

'बाबा, एक फ्रेंड येणार आहे. आम्हाला काही discuss करायचे आहे.' मुलाचा फोन.

माझा मुलगा 'टीन' वयोगटातला.

'हो. येऊ दे की.' मी.

बेल वाजल्यावर दरवाजा उघडला. समोर माझा मुलगा आणि एक मुलगी. मुलगी असणं मला अनपेक्षित होतं. फ्रेंड म्हणजे मुलगाच असणार असं मी गृहीत धरलं होतं. का? - माझा समज. संस्कार. मुलाचा मित्र मुलगाच असणार. जास्तीकरून समाजात असंच असतं ना. आमच्यावेळी तर हे असंच अधिक होतं. शिवाय त्याने लिंगनिरपेक्ष फ्रेंड शब्द वापरला होता. मैत्रीण असे म्हटले असते, तर प्रश्नच नव्हता. मी काही जुन्या विचारांचा नाही. म्हणजे मुलाला मैत्रिणी असू नयेत, मुलाचे मित्र मुलगेच असावेत वगैरे. मलाही मैत्रिणी होत्याच की. पण आम्ही त्यांचा उल्लेख मैत्रिणी करायला कचरायचो. माझ्या वर्गातली, शाळेतली...असे काहीतरी सांगायचो. त्याही तसंच करायच्या. असो.

मुलगा व त्याची 'फ्रेंड' आतल्या खोलीत discuss करू लागले. मी बाहेर हॉलमध्ये माझ्या कामात. पण एक कान आत काय चालले आहे, त्याकडे होता. त्यांचे हसणे-खिदळणे कानावर पडत होते. त्यांना काही खायला द्यावे म्हणून आत गेलो. ती दोघं 'पुरेसे' अंतर ठेवून बसली नव्हती. मुलगे-मुलगे बसतील इतक्या सहजतेने बसले होते.

असाच दुसरा एक प्रसंग. आम्ही पुण्याला गाडी करून चाललो होतो. एक जागा रिकामी होती. मुलाने विचारले, 'एक फ्रेंड सोबत आली तर चालेल का? तिलाही पुण्यालाच जायचे आहे.' आम्हाला काहीच प्रश्न नव्हता. एक जागा रिकामी जाण्यापेक्षा आपल्या संबंधातले कोणी त्या जागेवर येत असेल, तर

चांगलेच होते. आम्ही रुकार दिला. ही 'फ्रेंड' दुसरी होती. Discuss वाली नव्हती. त्यांच्या गप्पा, त्यांच्यातले अंतर discuss प्रसंगाप्रमाणेच. इयरफोनचे एक टोक याच्या कानात तर दुसरे तिच्या.

तिसरा प्रसंग. 'व्हॅलेंटाईन डे'चा. माझा मुलगा कॉफीचा भोक्ता. स्टारबक्स कॉफी शॉपचा परमनंट मेंबर असल्यासारखा तेथे जात असतो. तासनतास बसत असतो. त्याच्या म्हणण्यानुसार, लॅपटॉपवर काम करत असतो. मीटिंग करत असतो. Discuss करत असतो. आम्ही नाही इराण्याच्या हॉटेलमध्ये पडून असू. ५० पैशांच्या कटिंगमध्ये ३ जण. थोडी श्रीमंती असली की बनमस्का आणि आणखी चहा. आता इराणी बंद व्हायला लागलेत. जे कोणी शिल्लक आहेत, तेथे आता १५ रुपयाला चहा. भलताच महाग. कटिंग मिळत नाही. स्टारबक्समध्ये तर दीडशेच्या पुढेच कॉफी सुरू होते. पण तेथे महाग-स्वस्त तुलना करायला काळाचा अवकाशच नाही. हे प्रकरण अलिकडचे. (असावे. म्हणजे मला आधी माहीत नव्हते.) आणि आम्ही इराण्यावाले तेथे जाण्याचा संभवही कमी. तर, प्रसंग व्हॅलेंटाईन डेचा. स्टारबक्सच्या फुकट ट्रीटची ऑफर माझ्या मुलाला मिळाली. अट एकच 'कपल'ने यायचं. आम्ही पति-पत्नींनी कान-मान उंचावली. आता हा कोणाला सोबत नेणार? त्याला विचारले. त्याने नाव सांगितले. ही तिसरीच कोणी मैत्रीण होती. तिलाच का? तर तिलाही कॉफीची आवड होती. आणि ती त्याच्याप्रमाणेच बरेच तास कॉफी पीत बसणार होती. कॉफीचे खरे दर्दी असेच असतात, हे आम्हाला ठाऊक नव्हते. बीअर-दारू पिणारे माहीत होते. त्यामुळे या निकषांवर स्टारबक्समध्ये यायला लायक व त्यावेळेस जी उपलब्ध असेल, अशी मैत्रीण त्याच्यासोबत गेली.

खरं म्हणजे, मला छान वाटले. असूयाही वाटली. आपल्याही अशा वेगवेगळ्या आवडीच्या मैत्रिणी होत्या. (त्यांना मैत्रिणी अशी जाहीर संज्ञा आम्ही वापरत नव्हतो, हे वर आलंच आहे.) काहींना साहित्यात-कवितांत रस होता. काहींना खूप गप्पा मारण्यात रस होता. काहींना चांगलेचुंगले पदार्थ करण्यात रस होता. काहींना नृत्य-गाणे-नाटकांत रस होता. काहींना फिरण्यात रस होता. पण यांपैकी आपल्या आवडीशी मेळ असणाऱ्या कोणाहीबरोबरोबर एकट्याने जाण्याचा योग येणे शक्य नव्हते. जायचे तर गटाने. याची एवढी सवय (किंवा धसका) आहे की, हल्ली सहकारी कार्यकर्ती/मैत्रीण (हल्ली मैत्रीण म्हणण्याइतपत

आम्ही पुढारलो आहोत) एकटी सोबत असली तरी हॉटेलमध्ये जाताना अजून कोणीतरी सोबत असेल, याची दक्षता घेत असतो. आमच्या अध्यापक विद्यालयातील शिक्षिका शिकवताना एकदा म्हणाल्या, '.... म्हणजे असे पहा. कोणी म्हणाले- माझ्या बायकोचा हा मित्र. तर कसे वाटेल?' बायकोचा मित्र म्हणजे जणु तिचा प्रियकरच, असे त्यांना सुचवायचे होते, हे कळल्याने मला खूप निराश व्हायला झाले. मला काही मैत्रिणी होत्या. पण त्या सगळ्यांना मैत्रीण मानणे कठीण झाले होते. कोणातरी एकीलाच मैत्रीण म्हणू शकत होतो. अर्थात ती माझी प्रेयसी व्हायला हवी होती व पुढे तिच्याशी लग्नही व्हायला हवे होते. हे काही शक्य नव्हते. आम्ही मग बरेचदा काहींना राखीव करून उर्वरित मैत्रिणींकडून रक्षाबंधन किंवा भाऊबीज करून घेत असू. असे केले की आम्ही सेफ. तिच्या घरी मोकळेपणाने जात असू. शिक्षकांसमोरही आम्ही छान एकत्र वावरत असू. बाजारात खरेदीला एकत्र जात असू. मानलेली बहीण किंवा मानलेला भाऊ हे आमचे त्यावेळी संरक्षक कवच होते.

माझ्या मुलाला किंवा त्याच्या मैत्रिणींना ही सर्कस करावी लागत नाही, हे किती छान आहे. जसा मुलगा मित्र तशी मुलगी मैत्रीण. त्याच्या पाठीवर मी थाप मारेन तशी तिच्या मारेन. त्याच्या खांद्यावर हात ठेवेन, तसा तिच्या ठेवेन. ज्या मित्राशी ज्या बाबतीत माझे जुळते त्याच्याबरोबर मी ती गोष्ट करेन. त्याचरीतीने मी मैत्रिणीची निवड करेन.

स्त्रीला स्पर्श ही तर इलेक्ट्रिक शॉकसारखीच बाब वाटायची आम्हाला. अर्थात, स्त्री-पुरुष आकर्षणाचे वय सुरू झाल्यावर. त्या हँगओव्हरमधून मी अजूनही पूर्ण बाहेर निघालो नसेन म्हणा, म्हणूनच गाडीत बसताना सहकारी कार्यकर्तीला आपला स्पर्श कमीतकमी होईल, याची दक्षता घेत असतो. माझ्या या वागण्याची त्या थट्टा करत असतात. त्यांच्या दृष्टीने माझ्या या अतिरेकाचा त्यांना त्रासही होत असावा. एकतर एकदा चिडून म्हणाली, 'तू जर असं करशील तर तुझ्या मांडीवरच बसेन.' हे ऐकून सटपटलो होतो. दिल्लीला एका कार्यकर्तीने 'hug'केले तेव्हा तो मला सांस्कृतिक शॉक होता. पुढे त्याची सवय झाली. जिच्याशी अधिक जवळची मैत्री झाली तिच्याशी बोलतानाही आम्ही 'मेरे मेहबूब'मधल्या राजेंद्र कुमार-साधनासारखे दोघांत ५ फूट अंतर ठेवून बोलत असू. (आम्ही म्हणत असता एका विशिष्ट आर्थिक व सामाजिक स्तरातील हा

अनुभव आहे, हे नमूद करायला हवे. माझ्या वयोगटातील अन्य स्तरांतील मंडळींच्या अनुभवांत फरक असू शकतो.)

या नवीन मुलांची ही नाती मोकळेपणाची आहेत, त्यातून जोड्या शोधण्याचा प्रयत्न करू नये, हे कळते. तरीही आम्ही त्यांच्या फेसबुकवरचे संवाद, फोटो तपासत असतो. ते तर कधी कधी अब्रह्मण्यम् वाटते. काय भाषेत (त्यात लैंगिक comments असतात) ही मंडळी बोलत असतात, काही सहन होत नाही. पण सांगताही येत नाही. अशीच comment मैत्रिणीच्या पोस्टवर आमच्या माहितीतल्या एका मुलाने केली. त्याच्या काकांनी वडीलधारेपणाने त्याला अशी भाषा न वापरण्याचा सल्ला फेसबुकवरच जाहीरपणे दिला. त्यावर त्या मुलाच्या मैत्रिणीनेच या काकाला प्रौढपणाने समजावले, 'अंकल, यह कोई बडी बात नहीं.' ...मी लक्ष ठेवतो. पण असा सल्ला देण्याचे धारिष्ट्य करत नाही.

काय आहे, चेतन भगतची 'One night at call centre' वाचल्यापासून थोडी धाकधूक असते. त्याच्या कादंबरीतल्या पोरी पर्समध्ये निरोध ठेवून असतात. कोणाशीही, कोठेही (अगदी गाडीतही) सेक्स करतात. ते वाचल्यावर आपली मुले-मुलीही असेच काही करत असतील, अशी दृश्ये डोळ्यासमोर तरळू लागतात. मोकळी मैत्री ठीक आहे. पण असे काही झाले तर काय?

शरीरसंबंध हे लग्नानंतरच असायला हवेत, ही धारणा आमच्या आत घट्ट असते. वास्तविक, शरीराच्या अन्य गरजांप्रमाणे ती एक, असेच त्याकडे पहायला हवे. अर्थात, यात अधिक जबाबदारी हवी. परस्परांविषयी एक जवळकीचे-प्रीतीचे नाते तयार झाल्यावरच या संबंधांतील रंगत वाढते, हे या पिढीने समजून घ्यायला हवे, हे नक्की. कोणाचे कितीजणांशी संबंध आले, लग्नाआधी की नंतर यावर नैतिकता ठरवू नये, हे बरोबर. पण नाते गंभीर व जबाबदार असायलाच हवे.

कुटुंबव्यवस्था बदलत आली आहे. ती पुढेही बदलत राहणार आहे. 'चारचौघी' नाटकात नायिकेचा दोघा पुरुषांबरोबर एकत्र राहण्याचा निर्णय एक पति-एक पत्नी या नैतिक गृहीतकाला धक्का देऊन जातो. पण त्या तिघांना जर ते चालणार असेल, तर इतरांना त्यात पडण्याचे कारण काय? त्यामुळे समाजाला काय त्रास होतो? तेच समलिंगी संबंधाचे आहे. हे संबंध ठेवणाऱ्यांची ती

वैयक्तिक निवड आहे. 'फायर' सिनेमात हे संबंध दाखवल्यावर समाजात अस्वस्थता तयार झाली. टीका झाली. विरोध झाला. आता तर अशा संबंधांना प्रतिबंध करणाऱ्या ३७७ कलमाचा फेरविचार करण्याचे सर्वोच्च न्यायालयात घाटत आहे. हे सुचिह्न आहे. 'पिकू'सारख्या सिनेमात नायिका virgin नाही, हे तिचा बापच सांगत राहतो. तिच्या नायिकापणाला त्यामुळे बाधा पोहोचत नाही.

माझ्या मुलासारखा नव्या पिढीतील एक विभाग जातीपातींच्या स्वरूपाला बराचसा अज्ञात आहे. हे एकापरीने चांगलेही आहे. जातींचा अंदाज घ्यायला म्हणून, त्याला त्याच्या मित्र-मैत्रिणींची नावे आम्ही विचारतो. पहिलेच नाव तो सांगतो. आडनाव विचारले तर त्याला बहुधा ते माहीतच नसते. त्याच्या शाळेतही पहिल्या नावानेच हाक मारत. जी काही आडनावे त्याला माहीत असतात, ती लिहिलेली. त्यांचा उच्चार त्याने ऐकलेला नसतो. त्यामुळे 'फडणवीस' चा उच्चार तो 'फडनाविस' असा करतो; तर 'कांबळे' हे आडनाव 'कांबले' असे उच्चारतो. वास्तविक, तो मराठी माध्यमातला आहे. पालकसभेत मुलांचे पेपर बघायला दिले जात त्यावेळी त्याने मराठी-हिंदीत उत्तम निबंध लिहिलेले मी वाचले आहेत. पण त्याचे हे मराठी माध्यम नावाजलेल्या इंग्रजी शाळेतले. त्यामुळे इंग्रजीचे वातावरण भोवताली व शाळाही मराठी माध्यमांतल्या मुलांचे इंग्रजी खास लक्ष देऊन करून घेणारी. त्यामुळे त्याची आताची व्यवहाराची-मनोरंजनाची भाषा मुख्यत्वेकरून इंग्रजी असते. त्याचे मित्रवर्तुळही त्याच प्रकारचे आहे. ही मंडळी मराठी जवळपास वाचतच नाहीत. (त्यामुळेच तर मी त्याची उदाहरणे बिनधास्तपणे या लेखात घेतली आहेत. तो हा लेख वाचणार नाही, हे मला ठाऊक आहे. मुद्दाम खोड काढायला कोणी निदर्शनास आणून दिला तरच.)

तर, माझ्या मुलाचा हा विभाग बहुंशी जातपात न कळणारा आहे. आजच्या बाहेरच्या राजकीय वातावरणामुळे हिंदू-मुसलमान कळणारा आहे. पण त्याचा त्यांच्या संबंधावर परिणाम होत नाही. ही मंडळी त्या अर्थाने बरीचशी सेक्युलर आहेत. शहरात स्त्री-पुरुष संबंधांतला धीटपणा अमलात आणण्यासाठीच्या अनुकूल वातावरणात राहणारी. हे ग्रामीण वा अन्य आर्थिक-सामाजिक वातावरणातील मुलांना सरसकट लागू होणार नाही. पण तेथेही मुले-मुली बऱ्यापैकी धीट झालेली आढळतात. सर्व थरांतल्या मुलांच्या या धिटाईचे

स्वागत करताना नातेसंबंधांतल्या जबाबदारीची व त्यातील सौंदर्याची जाणीव त्यांना करून देणे निकडीचे आहे.

'इन्ही लोगोंने ले लिना (हिंदीत 'लिया'; अवधी बोलीत 'लिना') दुपट्टा मेरा' असे पाकिजात मीनाकुमारी गाते तेव्हा, तिची ही शिकायत बाईचे शोषण करणाऱ्या पुरुषजातीविषयी, पुरुषप्रधान समाजव्यवस्थेविषयी असते. माझा दुपट्टा (अब्रू) कोणी घेतला ते मला काय विचारता; शिपाई, व्यापारी आणि तुम्ही स्वतःला विचारा, असे ती बजावत असते. स्त्रीचे दुय्यमत्व व शोषण हे शेकडो-हजारो वर्षांचे दुखणे आहे. मोकळ्या होत चाललेल्या वातावरणातही त्याची वेदना तीव्र आहे. दीपिका पदुकोणच्या पेहरावावर ट्विटरवरून निरर्गल कॉमेंट करण्यात टाईम्ससारख्या प्रथितयश बातमीदार संस्थेचाही तोल जातो. अर्थात, दीपिकाही 'हो. स्त्रियांना स्तन असतात. मी स्त्री आहे. मलाही स्तन आहेत व स्तनांमध्ये दरी.' असे त्याला सणसणीत लगावते. दीपिकावर (खरं म्हणजे ९९ जणींवर) चित्रित झालेला My body, My mind, My choice हा अडीच मिनिटांचा लघुचित्रपट पुरुषप्रधानतेच्या मुस्काटात लगावलेली अशीच सणसणीत चपराक आहे. स्वतःच्या शरीरावरील अधिकाराविषयी, कोणाशी संबंध ठेवावे वा ठेवू नये याविषयी ती जे काही बोलताना दाखवले आहे, ते खूपच Bold आहे. पण गैर नाही. ते असंच्या असं आता अमलात आणलं पाहिजे किंवा येईल, असं नव्हे. तिच्या या भावनांचा उद्रेक पुरुषप्रधान व्यवस्थेतील 'इन्ही लोगों'मुळे आहे, हे विसरता कामा नये.

या सगळ्या Boldnessचे, धिटाईचे आधी म्हटल्याप्रमाणे स्वागतच आहे. पण या धिटाईला जबाबदारीचे, परस्परांवरील प्रेमाचे कोंदण आवश्यक आहे. तरच हे 'BOLD' 'BEAUTIFUL' होईल.

- *सुरेश सावंत,* sawant.suresh@gmail.com

---

साभारः *मी मराठी,* रविवार, २८ फेब्रुवारी २०१६

***

# मुली

*देवमणी पांडेय*

आता आणखी वाट नाही पाहणार मुली
त्या घरातून बाहेर पडतील
बिनधास्त रस्त्यांवरून धावतील
उसळतील, कुदतील, खेळतील, उडतील
मैदानांतून निनादतील त्यांचे आवाज
आणि हास्यध्वनी

मुली थकल्याहेत
रांधावाढाउष्टीकाढा करून व रडून
त्या आता नाही खाणार मार
नाही ऐकून घेणार कोणाचेही टोमणे
आणि रागावणे

ते  दिवस, जेव्हा मुली
चुलीसारख्या जळायच्या
भातासारख्या रटरटायच्या
गाठोड्यासारख्या कोपऱ्यात पडून राहायच्या
केव्हाच संपले

आता नाही ऐकू येणार दारांमागचे त्यांचे हुंदके
अर्धस्फुट उद्गार किंवा भुणभुण
आणि आता भिजणार नाहीत उश्यादेखील

***